# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | **सद्धर्म : त्रैमासिक** |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०१४ |
| वर्ष | : | एकोणपन्नासावे |
| अंक | : | तिसरा |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**

**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१४**

**गणपत्रिका क्रमांक : १८१**

Registered with the Registrar of News-paper for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
**गुंडोपंत हरिभक्त**

**वार्षिक ऐच्छिक देणगी**
**किमान ७५ रुपये**

**दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.**
**भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $**

# सद्धर्म
## त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

**सुवर्णमहोत्सव १५ ऑगस्ट १९६५ ते १४ ऑगस्ट २०१५**
**वर्ष : एकोणपन्नासावे, अंक : तिसरा, आश्विन/कार्तिक शके १९३६, ऑक्टोबर २०१४**

## *संपादकीय*

### मंगळ आणि 'मंगळ'

भारताने नुकत्याच केलेल्या यशस्वी मंगळ मोहिमेमुळे भारतीयांमध्ये एक वेगळाच आत्मविश्वास निर्माण झाला आहे. अमेरिका, युरोपियन देश या सर्वांनी मिळून अजूनपर्यंत पन्नासहून अधिक मंगळस्वाऱ्या केल्या असल्या तरी, पहिल्याच प्रयत्नात भारताची मंगळ मोहीम यशस्वी झाल्यामुळे तिला एक वेगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे. शिवाय या मोहिमेमध्ये तिच्या आखणीपासून ते अंतिम कार्यवाहीपर्यंत सर्व टप्प्यांवर भारतीय वैज्ञानिकांचाच सहभाग होता. एवढेच नाही तर याकरता लागणारी सर्व यंत्रसामग्रीही भारतीय बनावटीचीच होती. याचमुळे दुसऱ्याही एका 'मंगळ' मोहिमेच्या चर्चेला चालना मिळाली. यामागचे दोन प्रवाह मात्र समाजातील दोन भिन्न विचारांशी जोडलेले आहेत. मंगळयान ही 'विज्ञाननिष्ठ' तर ज्योतिषशास्त्रातील मंगळाचा मानवावरील प्रभाव हा 'अंधश्रद्धे'चे प्रतीक, या विचारासभोवतीच ही चर्चा होत राहते. साहजिकच यामुळेच देव, धर्म, कर्मकांड आणि त्यांचा लोकांवरील प्रभाव हे सर्वच 'अंधश्रद्धा' समजून, त्यांना 'अवैज्ञानिक' म्हणून वर्ग करण्याचाही काहींचा प्रयत्न असतो. सुदैवाने प्रचारकी सुधारकांचा तसा आग्रह असला तरी धर्म आणि विज्ञानाच्या समाजशास्त्रीय आणि इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांचे मात्र तसे मत दिसत नाही. माणसाच्या जगण्याकरता जेवढी विज्ञानाची आवश्यकता आहे, तेवढीच श्रद्धाच काय; परंतु अंधश्रद्धांचीही आवश्यकता आहे. यातील कोठल्याही विचारांचा अतिरेक हा हानिकारकच असतो, आणि म्हणूनच या दोन्ही बाजूंचा विचार हा परस्परविरोधी आणि एकांगीपणे करणे हे समाजाला हितकारक नसते. याच विषयावर १९९२ साली 'शोध अंधश्रद्धेचा' हे पुस्तक प्रकाशित करून त्यामध्ये या चळवळीमागील वैचारीक प्रवाहांचा विस्ताराने ऊहापोह मी केला आहे.

(पृष्ठ क्र. २९ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : **सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट,** द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१.दूरध्वनी : २५४७२७७१ कार्यालयाची वेळ : सकाळी १० ते सायं. ७.

३) **सभासद देणगी** : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता)

परदेशस्थ सभासदांना १२५ पहिली आजीव सभासद योजना १९७६ ते १९७८ पर्यंत होती. त्याकरता देणगी फक्त २५ रु. होती. (त्यावेळी वार्षिक देणगी २ रु. होती.) काही तांत्रिक कारणाने ती योजना बंद करावी लागली. पुन्हा एप्रिल १९९८ ते मार्च २००० पर्यंत आजीव सभासद योजना अस्तित्वात होती. याकरता ५०० रुपये देणगी होती. गेल्या काही वर्षापासून महागाई उत्तरोत्तर वाढत जात आहे. यामुळे ही योजना एप्रिल २००९ पासून बंद करण्यात आलीव नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, मनीऑर्डर, धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) ट्रस्टच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहीती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| **बँक** | **शाखा** | **शाखा क्रमांक** | **खाते क्र.** |
|---|---|---|---|
| भारतीय स्टेट बँक | जे के ग्राम, ठाणे (प.) | ९०५६. | **१०८८४९३००९५५** |
| ठाणे जनता सहकारी बँक | खोपट, ठाणे(प.) | | १६६८९ |
| ठाणे भारत सहकारी बँक | मुख्य शाखा, नौपाडा, ठाणे(प.) | | २४५२० |

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

देणगी खालील ठिकाणी ही स्वीकारली जाते.

अ) **श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**, कापडाचे व्यापारी, १४८, प्रार्थना समाज, गिरगांव, मुंबई - ४०० ००४. दूरध्वनी : २३८८०६४५ (रविवारी बंद) येथे **फक्त रोख रक्कम स्वीकारली जाईल. याठिकाणी मनीऑर्डर किंवा धनादेश पाठवू नये.**

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहितीकरता हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

**श्री. प्रकाश भा. दीक्षित**, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे४००६०१. दू.क्र : २५४७२००५, भ्र.क्र: ९८१९६९३१९५

अंकाच्या पाकिटाच्या पत्त्यावर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वा. दे.(वार्षिक देणगीदार सभासद), दी. का.(दीर्घकालीन सभासद),आ. (आजीव सभासद), का.भे. (कायम भेट)'वा. दे.' व 'दी. का.' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष दिले आहे.

- संपादक

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| सार्थ श्रीशङ्कराचार्यविरचितो श्रीशिवमानसपूजा। | ६ |
| जम्मू आणि काश्मीर : इतिहासाचा वेध | ७ |
| भारतीय जीवनात नर्मदा नदीचे स्थान | १० |
| 'नामसाधना' या विषयावरील काही बोधवाक्ये | १७ |
| गीतकृष्णायन-भाग ३ . कृष्णलीला | २१ |
| कै. विनायक चिंतमणी धोरे : एक झंझावती व्यक्तिमत्व | २४ |
| कौटिल्य अर्थशास्त्र | २५ |
| जिवन करि जिवित्वा ... | २७ |


**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

१) सुलभ संध्या व पूजा रु. ५
२) श्री गणेश चतुर्थी पूजाविधि रु. ५
३) हरितालिका पूजा विधि रु. १०
४) श्री सत्यनारायण पूजा व कथा रु. १५
५) कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) रु. १०
६) तुलसी विवाहविधि रु. १०
७) पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) रु.२५
८) कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक रु.१५
(या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.)
९) सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) रु.३०
१०) उपासना रु. ४०
११) श्रीरामरक्षेतील व्याकरण रु. ५०
१२) चांगदेव पासष्टी रु. ४०
१३) गंगालहरी रु. २५
१४) गणपत्यथर्व शीर्षांतील व्याकरण रु. ३०
१५) सांख्यदर्शन रु. ५०

सद्धर्म प्रकाशनांत दूरूस्ती - १५. सांख्यदर्शन हे पुस्तक एप्रिल १३ पासून सवलतीच्या दराने ३०/- रुपयात देण्यांत येणार आहे. वाचक व देणगीदारांनी याचा फायदा घ्यावा.

**दीर्घकालीन सभासद (दी का)**

श्री. प्रसाद पद्माकर वाड, पुणे श्री. चंद्रकांत गोपाळ शहाणे, सातारा

**देणगी जुलै ते सप्टेंबर २०१४**

श्री. वासुदेव गोविंद दातार, ठाणे रु.५०१/- श्री. बिंदूमाधव श्रीनिवास खेडेकर, पुणे रु.५००/-
श्री. विनोद गोविंद शिरोडकर, मुलुंड रु.५००/- वेलणकर सुवर्ण तुला ट्रस्ट, सांगली रु.५००/-

**- संपादक**

कळविण्यास अत्यंत दु:ख होत आहे की, आपल्या ट्रस्टचे माजी कार्यकारी विश्वस्त व विद्यमान विश्वस्त श्री. विनायक चिं. धोरे यांना दि. २८ जुलै, २०१४ रोजी देवाज्ञा झाली. मृत्युसमयी त्यांचे वय ८९ वर्षे होते. ते अखेरपर्यंत ट्रस्टचे विश्वस्त म्हणून कार्यरत होते. गेली काही वर्षे त्यांनी प्रकृतीच्या कारणाने ट्रस्टच्या दैनंदिन कामकाजातून निवृत्ती घेतलेली होती. तरीही ते शेवटच्या श्वासापर्यन्त सद्धर्म कार्यात मनाने सहभागी होते. गेले काही महिने त्यांना दुर्धर आजाराने ग्रासलेले असूनही, त्यांनी अंगीकारलेला सद्धर्म कार्याचा वसा सोडला नव्हता हेच खरे. सर्व सद्धर्म परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**- संपादक**

लेख २० वा

**उपोषितस्य व्याघ्रस्य पारणं पशुमारणम् ।।**[२८३]

उपवास केलेल्या वाघाने आपला उपवास सोडणे म्हणजे कोणता तरी पशू मारणे.

पहिली ओळ : दुर्जनस्य विशिष्टत्वं परोपद्रवकारणम्।

दुर्जन एखादी विशिष्ट गोष्ट करायला जरी निघाले तरी ते समाजविघातक असते.

**कृपणेन समो दाता न भूतो न भविष्यति ।।**[२८४]

कंजूस माणसासारखा उदार, दान करणारा अजूनपर्यंत कोणी झाला नाही व होणार नाही.

दुसरी ओळ : अस्पृशन्नेव वित्तानि यः परेभ्यः प्रयच्छति।

संपत्तीला स्पर्श न करताच (म्हणजे तिचा उपभोग न घेताच) तो ती दुसऱ्याला देऊन टाकतो. (तो मेल्यावर त्याचे धन दुसऱ्यांना आपोआप मिळते.)

**कार्यध्वंसो हि मूर्खता ।।**[२८५]

(केवळ अपमान झाला म्हणून) कार्य सोडून देणे मूर्खपणाचे आहे.

सुरुवात - अपमानं पुरस्कृत्य, मानं कृत्वा च पृष्टतः।
स्वकार्यमुद्धरेत् प्राज्ञः, कार्यध्वंसो.......।।

अपमान विसरून व सन्मानाने पुढे होऊन माणसाने स्वतःचे कार्य साधून घ्यावे. निवडणुकीमध्ये दारुण पराभव झाला म्हणून पक्षाचे कार्यालयच बंद करून टाकणे शहाणपणाचे नाही.

**निःसारस्य पदार्थस्य प्रायेण आडम्बरो महान् ।।**[२८६]

काही ठिकाणी बाह्य देखावा भपकेबाज असतो, परंतु आत विशेष काहीच नसते. सर्व पोकळच असते.

मराठी म्हण-कण्या खाऊन मिशांना तूप लावणे.

दुसरी ओळ : कञ्चने न ध्वनि तादृक् यादृक् कांस्ये प्रजायते ।।

काशामध्ये (bell metal) ज्याप्रमाणे मधुर नाद असतो त्याप्रमाणे सोन्यामध्ये नसतो.

**को लोकमाराधयितुं समर्थः ।** [२८७]

अनेक लोकांची समजूत घालण्याची कोणात ताकद आहे?

वसन्त्यरण्येषु चरन्ति दुर्वाः
पिबन्ति तोयान्यपरिग्रहाणि।
तथापि वध्याः हरिणा नराणां ......को लोकम्...।।

पदच्छेद - वसन्ति + अरण्येषु, तोयानि + अपरिग्रहाणि

बिचारी हरिणे वनात राहतात, दूर्वा चरतात, (निसर्गातले) पाणी पितात (कोणाला काहीच उपद्रव करीत नाहीत) तरीदेखील त्यांची हत्या होते हिंस्र प्राण्यांकडून व माणसांकडून. त्यांना मारू नका असे सांगत राहिले तर कोण ऐकणार आहे?

**भवति योजयितुर्वचनीयता ॥**[२८८]

(अयोग्य) योजना करणाराची मात्र निंदा होते.

संपूर्ण सुभाषित :

कनकभूषणसङ्ग्रहणोचितो
यदि मणिस्त्रपुणि प्रणिधीयते ।
न स विरौति न चापि शोभते
भवति योजयितुर्वचनीयता ॥

कनकभूषण - सोन्याच्या दागिन्यात. सङ्ग्रहण उचित - जो (सुंदर मणी) बसविणे योग्य आहे. त्रपुणि - शिशात

प्रणिधीयते - बसविला गेला. विरौति - तक्रार करीत नाही.

योजयितुः - योजना करणाराची. वचनीयता - निंदा.

सोन्याच्या दागिन्यात बसविण्यास योग्य हिरा जरी शिशात बसविला गेला तरी तो तक्रार करीत नाही किंवा शोभत नाही असेही नाही. पण योजना करणाराची निंदा होते.

**गुणाः कुर्वन्ति दूतत्वं दूरेऽपि वसतां सताम् ॥**[२८९]

सज्जन कितीही दूर राहत असले तरी त्यांचे गुण त्यांच्या दूतांचे काम करतात.

दुसरी ओळ : केतकीगन्धमाघ्राय स्वयमायान्ति षट्पदाः॥

केवड्याचा वास भुंग्यांना दूरवरून आपणांकडे आकर्षित करतो.

**गुणवन्तः क्लिश्यन्ते प्रायेण भवन्ति निर्गुणः सुखिनः ॥**[२९०]

गुणवान हालअपेष्टा सहन करतात व निर्गुण सुखात असतात.

दु.ओः बन्धनमायान्ति शुका, यथेष्ट संचारिणः काकाः॥

पोपट पिंजऱ्यात अडकतात आणि कावळे मनसोक्त फिरतात.

। इति शम् ।

क्रमशः

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●

## *तर वैभव प्राप्त होते...*

सवानुरक्तप्रकृतिः प्रजापालन तत्पर।
विनीतात्मा हि नृपतिः भूयसीं श्रियमश्नुते॥

प्रकृति म्हणजे प्रजा आणि सल्लागार मंडळ यांची राजावर सदैव निष्ठा असेल आणि तो (राजा) प्रजेचे पालन तत्परतेने करीत असेल आणि तो स्वतः विनीत म्हणजे नम्र, शिक्षित आणि संयमशील असेल तत्व त्या राजाला आणि अर्थात प्रजेलाही समृद्धि आणि शांतना प्राप्त होईल. आता राजे कालबाह्य ठरले, मोडीत निघाले. त्यांच्याऐवजी 'पंतप्रधान' आणि मुख्य प्रधान आले. नाव बदलले, पण काम तेच. राजाचेच वरील गुण पंतप्रधान या मुख्य प्रधान यांचे ठिकाणी पाहिजेत. नसतील तर!

काय घडते ते आपण अनुभवीत आहोच.

●●●

लेख ३ रा

**सार्थ श्रीशङ्कराचार्यविरचिता श्रीशिवमानसपूजा । श्लोक ३ रा : छत्रं चामरयोर्युगं व्यजनकं चादर्शकं निर्मलं वीणाभेरिमृदङ्गकाहलकला गीतं च नृत्यं तथा । साष्टांङ्ग प्रणतिः स्तुतिर्बहुविधा होतत्समस्तं मया संकल्पेन समर्पितं तव विभो, पूजां गृहाण प्रभो ॥**

**संधी :** चामरयोः + युगं, च + आदर्शकं, स्तुतिः + बहुविधा, हि + एतत् + समस्तं, कलाः + गीतं

**शब्दार्थ -** छत्रं-छत्र, चामर-चवरी, युग-जोडी, व्यजनकम्-पंखा, आदर्शकम् - आरसा, निर्मलम्-स्वच्छ, भेरी-नगारा, काहल-शिंग (वाद्य), प्रणतिः-नमस्कार, संकल्पेन-मनातील बेताने, समर्पितम्-अर्पण केले आहे, विभो-हे शंकरा, गृहाण - स्वीकार कर, घे. स्वीकुरू-स्वीकार कर, घे. समास - वीणा, भेरि, मृदङ्ग, काहल-वाद्ये, साष्टांगम्-दोन पाय, दोन हात, दोन गुडघे, छाती आणि कपाळ अशा आठ अंगांनी जमिनीला स्पर्श करून केलेला नमस्कार. बहुविधा - अनेक प्रकारची.

**पादौ हस्तौ जानुनी द्वे उरश्चाथ ललाटकम् । अष्टाङ्गेन स्पृशेद् भूमिं साष्टाङ्गप्रणतिश्च सा ॥**

**अन्वय :** हे प्रभो, छत्रं, चामरयोः युगं, व्यजनकं, निर्मलम् आदर्शकं, वीणा-भेरि-मृदङ्ग-काहल-कला, गीतं च नृत्यं तथा साष्टाङ्गं प्रणतिः, बहुविधा स्तुतिः, मया एतत् समस्तं संकल्पेन तव समर्पितम्। हे विभो, त्वम् एतां पूजां गृहाण।

**भाषान्तर -** हे प्रभो, छत्र, दोन चवऱ्या, पंखा, स्वच्छ आरसा, वीणा, भेरी, मृदंग, शिंग, गायन आणि नृत्य ह्या कला, तसेच साष्टांग नमस्कार, अनेक प्रकारची स्तुती हे सर्व मी मनाने कल्पून तुला अर्पण केले आहे. हे परमेश्वरा, तू ह्या पूजेचा स्वीकार कर.

वृत्त - शार्दूलविक्रीडित. वृत्ताची ओळख अगोदरच करून दिली आहे.

क्रमशः

**दि. दा. औटी**

●●●

## *अमात्यस्य दूषणम्...*

प्राप्तार्थग्रहणं द्रव्यपरिवर्तेनुरोधनम्।
उपेक्षा बुद्धीहीनत्वम् भोगोऽसात्यस्य दूषणम्॥

मिळेल त्या संपत्तीचा (ती कोणाकडून आली, कशाकरतां आली, कोणत्या रूपांत आली याचा विचार कर करतां) स्वीकार करणे, मिळालेल्या त्या संपत्तीचे योग्य रूपात परिर्वतन करणे, योग्य विनिमय न करणे, शाासनसंस्था, प्रजेचे रक्षण-पालन या विषयींच्या आपल्या कर्तव्याबद्दल उपेक्षावृत्ति बाळगणे, बुद्धीहीनता आणि वैयक्तिक भोगोपभोगांची लालसा हे अमात्याचे दोष आहेत. अमात्याचे ठिकाणी ते नसावेत.

पूर्वीचे अमात्य, आता त्यांना मंत्री म्हणतात. नाव बदलले तरी त्यांच्या गुणदोषांची नावे तीच आहेत.

उपभोगांची लालसा असलेला मंत्री आजही नसावा, तसा मंत्री असेल तर? देशाचे दुर्दैव म्हणावयाचे...

●●●

# जम्मू आणि काश्मीर : इतिहासाचा वेध -२

मु. दि. आपटे
अनुवादक

इसवी सन १०१५ आणि १०२१ या दोन वेळा महम्मूद गझनीने काश्मीर बळकावण्यासाठी केलेले प्रयत्न फुकट गेले. इ.स. १२२३ मध्ये रिमचान या नावाच्या तिबेटीने त्या वेळच्या रामचंद्र या राजाचा वध करण्यासाठी कटकारस्थान केले आणि काश्मीरचे सिंहासन आपण हस्तगत केले. एका सूफी संताच्या प्रभावाखाली येऊन त्याने इस्लाम धर्म स्वीकारून सदर-उद्-दीन रिमचान शाह ही पदवी धारण केली.

त्याच्या सिंहासनाधिष्ठित होण्यामुळे शाहमिरी सुलतान अला-उद्-दीन सुलतान शिकंदर (इ.स. १३८९ ते १४१३ हा काळ) याचा उदय झाला. त्यानंतर झैन-उल-अबिदीन (१४२० ते १४७० इसवी) याने काश्मीरवर राज्य केले. या घराण्याचा राज्यकारभार १५८७ मध्ये मुघल सम्राट अकबराच्या साम्राज्यात काश्मीरचे विलीनीकरण झाल्यामुळे संपुष्टात आला. अनेक देवालये आणि देवमूर्ती नष्ट केल्यामुळे सुलतान शिकंदरला जनता 'काश्मीरचा मूर्तिभंजक' म्हणूनही ओळखत असे. त्याच्याच सद्दीच्या कालखंडात काश्मीरमध्ये इस्लाम हा प्रमुख धर्म म्हणून स्थापित झाला. नामवंत सूफी संत मीर सयद अली हमदानी (हा सामान्यपणे बैन-इ-इस्लामी या नावाने ओळखला जाई) आणि सयद शर्फ-उद्-दीन बुलबुल या दोघांनी काश्मीरमध्ये इस्लामचा प्रसार करण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली होती. झैन-उल-अबिदीन (१४२० ते १४७० इसवी) हा सम्राट अकबरशी तुलना करता येण्यासारखा उदारमतवादी सुलतान होता. त्याच्या कारकिर्दीत - ज्याला काश्मीरचा सुवर्णकाळ असेही म्हणतात - काश्मीर सांस्कृतिकदृष्ट्या फार विकसित झाला होता.

चौदाव्या शतकात मुस्लिमांचे आगमन होण्यापूर्वीच्या एक हजर वर्षांपेक्षाही जास्त काळ काश्मीर हे शिक्षणाचे मोठे केंद्र होते. अभिनवगुप्त आणि वसुगुप्त यांसारख्या तत्त्वज्ञांनी शैव पंथात एक नवीनच उपपत्ती काढली होती. पाणिनी आणि पतंजलीसारखे संस्कृतज्ञ ऋषी त्या वेळी काश्मीरमध्ये होते. सर्व भारतातील आणि परदेशचेही विद्वद्गण ज्ञानप्राप्तीसाठी तेथे आकर्षिले जात होते. अफगाणिस्तान आणि मध्य आशियातून अनेक विद्यार्थी तेथे गणित, खगोलशास्त्र आणि तत्त्वज्ञानाचे शिक्षण घेण्यासाठी येत असत.

१५८७ मध्ये काश्मीर शक्तिशाली मुघल साम्राज्याचा भाग बनले होते. औरंगजेबाच्या कारकिर्दीत विद्वानांच्या आदरसत्काराच्या प्रथेला मोठा हादरा बसला. सम्राटाच्या हाताखालच्या इफ्तिकार खान या सभेदाराच्या हस्ते चाललेल्या एककल्ली आणि अन्यायी राजवटीने त्रासलेल्या काश्मिरातील पंडितांनी समकालीन शिखांचे गुरू तेगबहादूर यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या कानावर औरंगजेबाच्या मुस्लीम धर्मांध कारभारामुळे सहन कराव्या लागण्याच्या अनन्वित अत्याचाराची हकिकत घातली.

चौदाव्या शतकांत काश्मिरातील सूफी किंवा ऋषी (संत) यांनी प्रेम, बंधुभाव आणि दया या प्रथा सुरू केल्या होत्या. सूफी मुख्यत्वेकरून इराण आणि मध्य आशियातील असत तर ऋषी लाल देड, हब्बा खातून, मेहजूर आणि शेख नूर-उद्-दीन उर्फ नंद ऋषी उपाख्य अल्मेदार-इ-काश्मीर यांनी काश्मीरवर फार दूरगामी परिणाम करून ठेवले आहेत. त्यांनी ईश्वर हा एकच असून तो सर्वत्र वसतो अशी संकल्पना काढली. ईश्वराला जाणून घ्यायचे असेल तर त्याला सर्वथैव शरण गेले पाहिजे असा त्यांचा आग्रह असे.

१७५२ मध्ये दिल्लीला लुटून अहमदशहा अब्दाली आपल्या गावी अफगाणिस्तानला परतत असताना काही काश्मिरी लोकांनी त्याला भेटून आपल्या स्थानिक सुलतानाच्या सतत चाललेल्या छळापासून वाचवण्याची विनंती केली. काश्मीरचा ताबा अफगाणिस्तानच्या शहाने लगेचच घेतला. त्यामुळे काश्मीर आगीतून वाचले तरी फुफाट्यात पडले आणि अफगाणिस्तानच्या एकशाहीचा जाच १८१९ सालापर्यंत काश्मीरला सहन करावा लागला.

युरोपातील सारी राष्ट्रे (सारा युरोप हिंदुस्थानाच्या अर्ध्या क्षेत्रफळात बसू शकतो, मग राष्ट्रे किती लहान असतील?) सतत आपापसांत लढाया करीत असत. त्यांना 'क्रूसेड्स' किंवा धर्मयुद्धे असे म्हणत असत. आता आहे ते जर्मन राष्ट्र त्या वेळी ३५० छोट्या छोट्या जहागिरीसारख्या राज्यांत विभागलेले होते आणि बिस्मार्क झाला नसता तर ते सारे कधी एकत्रही झाले नसते . अमेरिका तर १७७६ पर्यंत अगदीच विसकळीत अवस्थेत होती आणि तिला आताचे एकसंध स्वरूप येण्यासाठी आपापसातले यादवी युद्ध (सिव्हिल वॉर)करावे लागले होते. युनायटेड किंगडम एकसंध झाले त्यासाठी इंग्लंड, स्कॉटलंड आणि वेल्समध्ये १७१० साली करार व्हावा लागला होता.

तौलनिकदृष्ट्या भारतभूमीची अवस्था फारच चांगली होती. देशात कधीही धर्माच्या नावावर लढाया झाल्या नाहीत. एतद्देशीयांत सदैव विविधतेत एकतेचे दर्शन होत राहिले. उदाहरणार्थ, आद्य शंकराचार्य दहाव्या शतकात केरळपासून काश्मीरपर्यंत फिरत आले होते आणि त्यांचे सर्वत्र स्वागत होत गेले होते. देशाच्या चारी कोपऱ्यांत त्यांनी (शंकराचार्य) मठांची स्थापन केली, श्रीनगरीलाही त्यांनी भेट दिली आणि राजा गोपादित्याने इ.स. पूर्व ३७१ मध्ये (दंतकथेनुसार) बांधलेल्या शंकराच्या देवळाला वंदन करण्याच्या हेतूने - आता शंकराचार्य टेकडी म्हणतात - त्या टेकडीवर ते चढूनही गेले होते.

गेल्या दहा वर्षांत काश्मिरला फारच कठीण परिस्थितीचा सामना करावा लागला आहे. जीनांच्या 'काश्मिरी लोक भारतापासून फार वेगळे आणि पाकिस्तानला फार जवळचे आहेत', या आवेशपूर्ण भाषणाचेच प्रतिध्वनी काढणाऱ्या पाकिस्तानवादी नेतेगणांनी विघटनवादी हिंसक चळवळ सुरू केलेली आहे. ही मंडळी इतिहासापासून काहीही शिकलेली नाहीत ही अगदी शोचनीय बाब आहे. जीनांच्याच धार्मिक असहिष्णुतेवर आधारलेल्या द्विराष्ट्रवादाच्या सिद्धान्तासमोरच १९७१ मध्ये पाकिस्तानची दोन शकले झालेली त्यांना दिसू शकलेली नाहीत. ते

सहजपणे पाकिस्तानच्या सापळ्यात अडकलेले आहेत तर अफगाणिस्तानातील घडामोडींमुळे आता पाकिस्तानला स्वतःला राष्ट्र कसे म्हणवून घ्यावे हा प्रश्न पडला आहे.

काश्मिर जितका मुसलमानांचा आहे तितकाच तो पंडित आणि शीख यांचाही आहे. आपल्या खास भौगोलिक परिस्थितीमुळे काश्मिरची घाटी शतकानुशतके वेगवेगळ्या वंश आणि संस्कृतींचा संगम अनुभवत आलेली आहे. त्याचमुळे सर्वच धर्म इथे चांगलेच भरभराटीस आलेले दिसतात. जमात - ए - इस्लामीसारख्या संघटना प्रतिपादतात तसल्या अतिरेकीपणात काश्मिरी जनतेस मुळीच रस नाही.

धर्मांध मंडळींच्या ही गोष्ट लक्षात आली पाहिजे की, जीनांच्या धार्मिक असहिष्णुतेमुळे पाकिस्तानही राष्ट्र म्हणून मूळ धरू शकले नाही तर मग काश्मिरवर तरी त्याचा कसा चांगला परिणाम दिसणार? या कडव्यांनी आता आपण खरेच काश्मिरमध्ये नागरिकी स्वातंत्र्याचेच खरोखर समर्थन करीत आहोत काय याचा मनाशी विचार केला पाहिजे. जर त्यांना त्याच्या मनाने होय म्हणून उत्तर दिले तर त्यांनी धार्मिक अल्पसंख्याकांबाबतची आपली वर्तणूक पुन्हा तपासून घेतली पाहिजे.

तसे न झाले तर, स्वतःहून दहशतीच्या मार्गाने पाकिस्तानच्या दडपशाहीला शरण जाण्याच्या त्यांच्या खेळाला ते आपणहून आणि स्वेच्छेने बळी पडले आहेत हे स्पष्ट होईल. त्यांनी ही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे की काश्मिरींमध्ये भारताविरद्ध मतभेद आणि द्वेष निर्माण करून छुपे युद्ध यशस्वी करण्याचे पाकिस्तानचे मनसुबे कधीही सफल होणार नाहीत. भारतातील इतर प्रांतांप्रमाणेच काश्मिर हे भारताचे एक अभिन्न अंग आहे.

(हा मूळचा इंग्रजीतील लेख श्री. शेर खान यांनी "Jammu and Kashmir : A Historical Perspective - ii" या मथळयाखाली Maharashtra Herald, Pune च्या १ डिसेंबर २००१ या अंकात प्रसिद्ध केला होता.)


**प्रा. मु. दि. आपटे**
३२, रक्षक वसाहत,
औंध कँप डाकघर,
पुणे - ४११०२७


## *विना दैवं न सिध्यति...*

दैव अनुकूल असल्याशिवाय कोणतेही आणि कोणाचेही कार्य साध्य होत नाही. शिरोभागी लिहिलेले सुभाषित तात्विक, तत्त्वमूलक आहे.

दैवं-देवस्य इदं दैवम् इदं शक्ति सामर्थ्य

देवाच्या कृपेशिवाय, सहाय्याशिवाय कार्याला सफलता प्राप्त होत नाही. गीतेत भगवंतानी 'दैवं चैवात्र पंचमम्' असे स्पष्ट म्हटले आहे.

दैव शब्द नशिब - नशी हा शब्द अनुकूल वा प्रतिकूल अर्थी रूढ आहे. त्याचा मूलार्थ न+शिव नशिब-नशीब.

शिव-मंगल नव्हे ते नशीब. नशीब-जीवनात प्रतिकूल घडले तर 'नशीब' म्हणून कपाळी हात मारणे ठीक. परंतु अनुकूल घडले असेल तर तेथे नशीब शब्द वापरणे अयोग्य. कारण देवाला स्मराल तर दैव प्रतिकूल कसे होईल!!

ही एकमेव नदी आहे जिची प्रदक्षिणा केली जाते. प्रदक्षिणा करणे ही सनातन धर्मातील स्वास्थ्यदायी व वैज्ञानिक परंपरा आहे. सनातन धर्मात प्रदक्षिणेचे जे कर्म आहे ते जीवनारंभापासून आतापर्यंत जे सोळा संस्कार आहेत त्या रूपात सापडते. प्रत्येक संस्कारात यज्ञ अटळ आहे व यज्ञवेदीची प्रदक्षिणा हे अनिवार्य कर्म आहे. याच कारणासाठी विवाहात यज्ञवेदीभोवती सप्तपदीरूपाने प्रदक्षिणेस विशेष महत्त्व आहे.

सर्व धर्मांत प्रदक्षिणेला अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान आहे. हिंदू धर्मात सर्व देवदेवतांची, मंदिरांची, यज्ञशाळेची प्रदक्षिणा आदिकालापासून करण्याचा प्रघात चालत आलेला आहे. एवढेच नव्हे तर तुळस, पिंपळ, आवळा, वड या वृक्षांनाही प्रदक्षिणा घातली जाते. मनुष्याच्या शरीरातही श्वासाची एक प्रकारे प्रदक्षिणाच सुरू आहे, ती चालू असेतोवर जीवन आहे. या प्रदक्षिणा परंपरेस भारतीय जीवनात अनन्यसाधारण स्थान प्राप्त झाले आहे. तसे पाहिले तर नवग्रह सूर्यप्रदक्षिणाच करत आहेत व ग्रहांचे चंद्र त्या त्या ग्रहांची. सूर्यदेखील सकल नवग्रहांसकट आणखी एका महाताऱ्याभोवती प्रदक्षिणा करीत आहे. आजही भाविक जन वृंदावन पर्वत, गणपतिपुळ्याचा डोंगर, चित्रकूट येथील कामदागिरी, अरुणाचलात महर्षी रमण तपःस्थल, कैलास पर्वत, अयोध्येत पंचक्रोशी, वृजमंडलमध्ये ऐंशी कोसांची इ. प्रदक्षिणा करताहेत. त्यामुळे त्यांचे अनेक कार्यभाग साध्य झाले आहेत. मुसलमान लोक मजारांची प्रदक्षिणा करतात. मक्का-मदिना या पवित्र स्थळी लाखो मुस्लीम श्रद्धावंत दरग्याची प्रदक्षिणा करतात. प्रत्येक धर्मात प्रदक्षिणा हा विधी आहेच.

अशा या नर्मदेचा उगम अमरकंटक येथे होऊन ती पश्चिमवाहिनी बनून गुजरात राज्यात खंबायत येथे रेवासागरमध्ये समुद्रास मिळते. मध्यप्रदेशात उगम व गुजरातमध्ये समुद्रमीलन असा हा तिचा जलप्रवाहमार्ग आहे. आजही तिच्या परिसरात घनदाट अरण्य व जंगली वन्य पशूंचा मुक्त संचार असतो. तिची पायी प्रदक्षिणा करण्यास तीन ते चार वर्षे लागतात. भारतातील पुष्कळ मंदिरांत नर्मदेश्वराची स्थापना केलेली आहे. नर्मदेत सापडणारे लाल खडे गणपती म्हणून प्रसिद्ध आहेत, तर बाकी सर्व खडे शिवस्वरूप मानले जातात. 'गजाननविजय' या संत श्रीगजानन महाराज, शेगाव यांच्या चरित्रात निमोणकरांना गजानन महाराजांनी तांबडा खडा दिला व तो 'नर्मदेचा गणपती' आहे असे सांगून त्या खड्यासमोर योगाभ्यास करण्यास सांगितले. त्यायोगे निमोणकरांना योगाभ्यास आला. आजही हा खडा गुजरातमध्ये त्यांच्या वंशजांकडे असून तो पूजेत आहे. त्याचा इतरांनी फोटो घेतल्यास तो फोटोत दिसतो, पण निमोणकरांनी फोटो काढल्यास त्यात येत नाही. हे नागपूरचे श्री. ढोवळे यांनी लेख लिहून प्रसिद्ध केले आहे. म्हणजे नर्मदेच्या पात्रातील खड्यांतही देवत्व वा दिव्यत्व असावे असे दिसते. समस्त देवगण, ऋषिमुनी, तपस्वी यांनी नर्मदेची प्रदक्षिणा केली आहे. आजही अनेक साधू, महंत, तपस्वी, योगी व

असामान्य तिची प्रदक्षिणा करीत आहेत. पुराणातील संदर्भानुसार नर्मदा अक्षय कुमारी व सर्व सुखदात्री, मंगलकारिणी मानली आहे आणि तिचे पावित्र्य उच्चतम मानले आहे. नर्मदेमुळेच नर्मदेश्वरास माहात्म्य प्राप्त झाले आहे. नर्मदेश्वराचे माहात्म्य असे सांगातात की एक कोटी वेळा माती वा दगडाच्या शिवलिंगाचे दर्शन केल्यास जे फळ मिळते ते सोन्याच्या शिवलिंगाचे एकदा दर्शन घेऊन मिळते. सोन्याच्या शिवलिंगाच्या कोटी दर्शनाचे फळ एक वेळ स्फटिकमणी शिवलिंगदर्शनात मिळते तर एक कोटी वेळ स्फटिकमणी शिवलिंगदर्शनाचे फळ नर्मदेश्वराच्या एकाच दर्शनात मिळते. या माहात्म्यामुळेच प्रज्ञाधाम, साकेत, नवी दिल्ली येथे नर्मदेश्वर या परमेश्वराची स्थापना केली असून लवकरच मणिशिवलिंग स्थापना विचाराधीन आहे.

नर्मदेश्वर दर्शन नर्मदादर्शनासमान मानले जाते. नर्मदेच्या दर्शनाने ते पुण्य प्राप्त होते जे गंगास्नान वा यमुनाजल आचमनाने मिळते. नर्मदेच्या तटाला तपोभूमी म्हटले आहे. या तटावर ब्रह्मा, विष्णू, शंकर, लोकपाल, देव, देवता, यक्ष, गंधर्व, किन्नर, अप्सरा, राक्षस, अस्वल, वानर यांनी तपस्येने सिद्धिप्राप्ती साधली आहे व आजही अनेक साधुसंत, महात्मे तपाचरणात लीन आहेत. असे म्हणतात, नर्मदातटी तपस्या करावी व मृत्यू गंगातटी व्हावा. 'रेवा तीरे तपः कुर्यात् मरणं तटे जान्हवी।' नर्मदेस शिवपुत्री म्हणतात. नर्मदा शिवकन्या आहे म्हणूनच 'नर्मदे हर' म्हणतात. शंकरांनी नर्मदेस वर दिला आहे की गंगेत स्नान केल्यास तत्काल निष्पाप होईल. यमुनाकिनारी सात दिवस राहून स्नान, पूजन, अर्चन करील तेव्हा पापमुक्त होईल व सरस्वतीकिनारी तीन दिवस राहील तर पापमुक्त होईल, पण तुझ्या केवळ दर्शनानेच जीवमात्र पापमुक्त होतील. त्याचबरोबर द्वादश ज्योतिर्लिंगांमध्ये काशीतील विश्वेश्वर जो नर्मदेश्वर आहे त्याच्या केवळ दर्शनाने कसलाही पापी पापमुक्त होईल. याच कारणास्तव जितकी तीर्थस्थाने या पवित्र नर्मदेच्या तटी आहेत तितकी इतर कोणत्याही नदीतीरी नाहीत. या नर्मदेकाठी ज्या तपोनिष्ठ ऋषी, संत, महापुरुषांनी तपश्चर्या केली त्यांच्या लहरी, स्पंदने, तेजोवलय वा प्रभामंडल आजही अस्तित्व दाखवतात. ती अनुभवास / प्रत्ययास येतात व नर्मदापरिक्रमण करणारे या तेजोवलय/प्रभामंडल वा तपस्येची स्पंदने वा लहरींनी भारावून जातात याच कारणास्तव या नर्मदा परिक्रमेस महत्त्व प्राप्त झाले आहे. नर्मदा प्रदक्षिणा पायी केली जाते. ती सर्वोत्तम पुण्यफलदायी आहे. सर्वसाधारणतः तीन वर्षे तीन महिने तेरा दिवस काळ लागतो. परंतु हे ज्यांना शक्य होत नाही ते मोटारमार्गे वाहनाने तीन आठवड्यांत नर्मदादर्शन, नर्मदास्पर्श, स्नान व जलपान यांचा लाभ घेतात. हेही नसे थोडके. ही परिक्रमा आख्यायिकेवर नसून विशुद्ध आध्यात्मिक मूल्य तथा विज्ञानाधिष्ठित मान्यता यांवर आधारलेली आहे. स्वामी प्रभुदत्त ब्रह्मचारींनी हजारो भक्त व रामलीला मंडळांसह ही प्रदक्षिणा वीस दिवसांत पूर्ण केली होती. नर्मदातीरी असलेल्या भेडाघाट येथे भृगुऋषींनी तसेच साँकलघाट या ठिकाणी आद्य शंकराचार्यांनी तप केले आहे. आजमितीसही नर्मदातीरी वेगवेगळ्या ठिकाणी अनेक आश्रमांतून हजारो मुनी, भक्त, योगी तपाचरण करीत आहेत.

प्रदक्षिणा करणे म्हणजे भ्रमण. विमानाचे पंखे जेव्हा भ्रमण करतात, तेव्हा ऊर्जा उत्पन्न होते. त्यामुळे विमानाचे वजन हलके होते व ते वर जाते. जेव्हा आपण पृथ्वीपासून उंच उंच जातो तेव्हा आपले वजन कमी होते. चंद्रावर ते १/६ एवढेच असते. गुरुत्वाकर्षण हे वजनकारक आहे. प्रदक्षिणा करताना आपण स्वतःस हलके अनुभवतो व शक्तिसंचय होतो. एक केंद्रबल ज्याला सेंट्रिफ्युगल फोर्स म्हणतात ते उत्पन्न होते. सगळे जग विश्वभ्रमण करीत आहे. ही भ्रमणावस्था म्हणजेच चैतन्य व भ्रमणसमाप्ती म्हणजे लय हे सिद्ध आहे. एका शायराच्याच शब्दांत ही अत्यावश्यकता प्रकटली आहे. तो शेर असाः -

'यात्रा (सैर) कर दुनियाकी गाफिल, जिंदगानी फिर कहाँ। जिंदगानी अगर रही तो, नौजवानी फिर कहाँ।' म्हणूनच या लेखात मी माता नर्मदेस त्याच प. पू. गजानन महाराजांच्या स्तवनाने प्रार्थना करतो की या लेखात काही त्रुटी राहिल्या असतील तर

नर्मदे मंगले देवी, रेवे अशुभनाशिनी।
मंतु क्षमा करी माझा, दयाळू होउनी मनी॥''
जय जय नर्मदे पुण्यश्लोक सरिते
वसंत लीन तव पदपंकजाते

पूर्वार्धात आपण नर्मदा नदीचे भौगोलिक, पुराणातील पौराणिक, ऐतिहासिक व अर्वाचीन वाङ्मयातील वर्णन वाचले असेल, ज्यावरून तिचे भारतीय जीवनातील दिव्य स्थान व महती कळते.

या उत्तरार्धात अधिक थोडी माहिती जाणून घेऊ या, जी या माहात्म्याला पूरक आहे.

नर्मदा नदीच्या उत्पत्तीसंबंधी अनेक कथा आहेत. वेगवेगळ्या पुराणांत वेगवेगळ्या कथा आहेत, पण त्यांत एकवाक्यता नाही. कोठे तिची उत्पत्ती शंकराच्या तांडवनृत्याने आलेल्या घामाच्या पुरातून तर कोठे तपश्चर्येत मान असलेल्या शिवाच्या घर्मबिंदूतून तर कोठे शंकराच्या चंद्रकलेच्या रसबिंदूतून इ. पण या सर्व कथांत एक भाग समान आहे तो म्हणजे तिची उत्पती शिवाच्या अंगातून झाली आहे. मग ते मस्तक असो वा चंद्रकला. म्हणूनच ती शिवकन्या आहे. स्कंदपुराणात माघ कृष्ण सप्तमी रविवार मध्यान्ह असा तिचा जन्मकाल सांगितला आहे. ''माघे च सितसप्तभ्यां दारूतमे च खेदिने। माध्यान्ह समये चैव भास्करेण क्रमागते'' असा श्लोक त्यात आहे. तर वसिष्ठरामायणात ती शंकरमस्तकी विराजित चंद्राच्या एका बिंदूचे पतन पृथ्वीवर झाले व त्यातून ती निर्माण झाली व शंकरांनी तिला वरदायिनी केले अशा प्रसंगाचे दगडी शिला उज्जयिनीपलीकडील लेण्यात आहे. शंकरांनी तिला मी जेथे असेन तेथे तूं शांत राहा असे सांगितले. त्यामुळे सर्व मोठ्या शिवदेवालयांसमोर नर्मदाप्रवाह हा शांत आहे. तिने शिवाज्ञेने भगवान विष्णूस नमन केले त्यामुळे विष्णुमंदिराच्या ठिकाणी नर्मदा चक्राकार होऊनच पुढे जाते. श्रीविष्णूंच्या मंगल आशीर्वादाने तिच्यातील शिलाखंड शिवरूप झाले. नर्मदेतील बाण व शिवलिंग प्रसिद्ध आहेत.

स्कंदपुराणात पंचमाध्यायात असे म्हटले आहे की गंगा वर्षातून एकदा नर्मदेस भेटण्यास येते व एक दिवस तिचे वास्तव्य नर्मदेत असते. हा दिवस ''वैशाख शुद्ध सप्तमी'' असतो. ज्या

लोककथेवर साधुसंत, महात्मेही विश्वास ठेवतात ती अशी की, गंगा अत्यंत काळ्याकुट्ट कपिला गाईच्या रूपात येते. नर्मदेत तीन दिवस वास करते व नंतर अत्यंत शुभ्र वर्णाची गाय होऊन बाहेर पडते. गंगादशमीच्या दिवशी नर्मदा जलस्तर सहा इंचांनी आपोआप वाढतो ही गंगा येण्याची पूर्वसूचना / संकेत असतो. ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदा ते शुद्ध दशमी प्रातःसमयी (सकाळी ६ ते ९ ) गंगा नर्मदेत स्थिर असते. ९ ते १२ यमुना वास करते व १२ ते ३ सरस्वती वास करते. दुपारी ३ ते प्रातः ६ पर्यंत नर्मदा स्वस्वरूपी असते.

विष्णुपुराणाप्रमाणे ती नागांची भगिनी आहे तसेच प्रिय लाडकी बहीण आहे म्हणून नागराजांनी तिला तुझे जो मनापासून स्मरण करील त्यास सर्पविषभय नाही असे वरदान देऊन

''नर्मदायै नमः प्रातः नर्मदायै नमो निशि।
नमो ऽस्तु नर्मदे तुभ्य त्राहि मां विषसर्पतः॥'' हा श्लोक म्हटल्यास विषबाधाभय नष्ट होईल हे सांगितले. नर्मदा उगम ते सागरसंगम या सर्व मार्गात सर्वत्र सारखीच पुण्यपद आहे. इतर नद्यांसारखी विशिष्ट ठिकाणी पुण्यपद असे नसून सर्वत्र सारखीच पुण्यपद आहे.

''पुण्या कनखले गंगा कुरुक्षेत्रे सरस्वती।
ग्रामे वा यदिवा ऽरण्ये पुण्या सर्वत्र नर्मदा॥''

गाव असो वा अरण्य, सर्वत्र नर्मदाप्रवाह पुण्यप्रदच आहे. तिचे नाव ''नर्मदा'' म्हणजे मनाला शांतता देणारी असे आहे. तिचे दोन्ही तट शिवलिंगांनी सुशोभित आहेत.

''यन्मूलेस्त्यमरेश्वरो विजयते श्रीसिद्धनाथस्तथा
कावेरीपरिवेष्टितो गतिदओंकारो ऽपरचासिता :
मध्ये ऽत्ये ऽपिचशूलपाणि सहिता : पाश्चात्य भागेस्थिताः
सर्वे ते भजत्तासभीष्टफलदा वर्तति सः नर्मदा''
(नर्मदालहरी)

हा श्लोक नर्मदालहरीमध्ये आहे. असा हा श्लोक - यातील बहुतांश मंदिरे पश्चिमाभिमुख आहेत. रेवाखण्डात नर्मदेची पंधरा नावे आहेत. तत्संबंधी श्लोक असा :

''शोणो महानदश्चैव नर्मदा सुरसा कृता।
मन्दाकिनी दशार्णा च चित्रकूटा तथैवच॥
तमसा विदशा चैव करभा यमुना तथा।
चित्रोत्पला विपाशा च रंजना वालुवाहिनी।
ऋक्षपादप्रसूतास्ताः सर्वा वै रुद्र सम्भवा॥''

ही नावे १) शोण २) महानद ३)नर्मदा ४) सुरसा ५) मंदाकिनी ६) दशार्णा ७) चित्रकूटा ८) तमसा ९) विदशा १०) करभा ११) यमुना १२) चित्रोत्पला १३) विपाशा १४) रंजना १५) वालुवाहिनी

''दर्शनेन नर्मदायास्तु अग्निष्टोमफलं लभेत''

म्हणजे नर्मदेत स्नान केल्याने व निष्काम भावनेने जलसेवनाने सुवर्णदानपुण्य मिळते/ फळ मिळते तसेच स्नानाने अग्निहोत्र केल्याचे व पितरांचे श्राद्ध केल्याचे फळ मिळते.

''नर्मदा प्रातरुत्थाय ये स्मरन्ति विचक्षणः।
पूर्वजन्मकृतं पापं ऐहिकं च विनश्यतिः॥''

सकाळी उठल्यावर नर्मदा नामस्मरण केले तर पूर्वजन्म व इहजन्स यांतील पापकर्मांपासून मुक्ती मिळते.

''नर्मदायास्तटैचैव प्राणांस्त्यजति मानवः।
कल्पकोटिक सहस्राणि स्वर्गलोक महीपते॥''

नर्मदातीरी प्राणत्याग करणारा हजारो कोटी कल्प स्वर्गलोकी निवास करतो. तिच्या प्रवाहात सोडलेल्या अस्थी पत्थर होतात. नर्मदेचे जल ब्रह्मा आहे, विष्णू आहे, शंकर आहे, तेच निराकार ब्रह्म व कैवल्य आहे. तो श्लोक असा :-

''इदं ब्रह्महरिश्च इदं साक्षात्परोहरः।
इदं ब्रह्म निराकारं कैवल्यं नर्मदाजलम्॥''

नर्मदाकिनारी स्वयंभू अशी श्रीशंकराची २८ लिंगे आहेत. त्यांची नावे अशी :

१) स्थानेश्वर २) महादेव ३) शूलपाणी अपरसत्येश्वर ४) कल्पेश ५) हिरण्य ६) जातवेदा ७) प्रजापत्य ८) सिद्धनाथ ९) शशांकनयन १०) अनुकेश ११) स्कन्द १२) आश्विन १३) तेजस १४) ब्रह्मेश्वर १५) अग्निगर्भ १६) श्रीकण्ठ १७) त्र्यंबक १८) उमापती १९) नीलकण्ठ २०) खट्वांग २१) महाकाल २२) घटेश्वर २३) त्रिलोचन २४) देवदेव २५) महेश्वर २६) अनंगलिंग २७) कामदेवलिंग २८) सिद्धमन्वंतरलिंग.

नर्मदेच्या उत्तरेस कपिलतीर्थ आहे. तेथे कठोर तप/व्रतपालन करणारे स्त्रीपुरुष देवता व पितरांचे तर्पण करून तिन्ही ऋणांतून मुक्त होतात. तिच्या उत्तर तटावर त्रिपुरी तीर्थ आहे, जेथे सव्वा लाख तीर्थे व १०८ स्वयंभू शिवलिंगे आहेत. त्यासंबंधी श्लोक असा आहे :

''त्रिपुरी नाम विख्यातं रेवाया उत्तरे तटे।
सव्वा लक्षतीर्थानि यन्नतिष्ठान्ति भारत।
शतमष्टोत्तर तत्रलिंग नास्तु स्वयम्भुवात।''

नर्मदेच्या अमरकंटक परिसरात अनेक दुर्मीळ औषधी वनस्पती आहेत. अमरकंटक हे अशा औषधी वनस्पतींचे आगरच आहे. अनेक जडीबुटीवाले तेथे हा धंदा करत असतात. शिवकंद, कमलगट्टा, निर्मली, शंखपुष्पी, ओवा, कामराज, अश्वगंधा, वनआद्रक इ.इ. सांधेदुखी, ताकद, नेत्रविकार, स्मरणशक्ती, पौरुषत्व, खोकला इ. विकारांवर या वनस्पती तेथे मिळतात. शिवाय अनेक दुर्मीळ वनस्पतीही उपलब्ध असतात. परिक्रमावाले व अनेक यात्रेकरूंना त्यांची खरेदी तेथे करता येते व ते करतात त्यामुळे हा धंदा तेथे तेजीत आहे.

नर्मदेच्या दक्षिण तटावर गोमुख, मोरटक्का, मदिना बकावा, तेली भड्याण, बाळखेडा, सहस्रधारा, खलघाट, दत्तवाडा, राजघाट, बडवानी, गोरागांव, झगडिया मढी, रामपुरा वा धनेश्वर, व्यासतीर्थ व (शुकदेव), कार्तिकस्वामी, आसा, भालोद, कठपोर इ. गावे लागतात तर उत्तर तटावर हरिधाम, भारभूतेश्वर, गरुडेश्वर, भडोच, झाडेश्वर, शुक्लतीर्थ, अंगारेश्वर धर्मशाळा, मोटी कोरल, नारेश्वर, मालसर, शिमोर, अनुसया आश्रम, दरियापूर व दरिकाश्रम, रांगनाथ, चांदोद कर्नाळी, कोटेश्वर, चिखलदा, बागनाथ, बडा वरदा, विडी संगम, महेश्वर, मंडलेश्वर, खेडीघाट-बडवाह, चौबीस अवतार, नेमावर, सीतावन, धावडीकुंड, प्रेमगढ - भेटखेडा- पामाखेडी, फत्तेगढ, जबलपूर, मंडला, जोगी टिकडिया, अमरकंटक, होशंगाबाद, लोकसर, गोंदागांव - गंगेश्री, ओमकारेश्वर, सातमातरा, कावेरीसंगम, अमलेश्वर अशी प्रमुख स्थाने लागतात.

नर्मदा प्रदक्षिणा आता मोटारीने करतात, ही प्रथा श्री प्रभुदत्त ब्रह्मचारी यांनी वृद्धावस्थेमुळे मोटारीने करून सुरू केली व ती आता चांगलीच लोकप्रिय झाली कारण पायी प्रदक्षिणेस लागणारा प्रदीर्घ काळ, कष्ट आणि जंगलात हिंस्र पशू व लूटमार करणारे भिल्ल इ. पण तरीही पुष्कळ लोक ही प्रदक्षिणा पायी करतात कारण त्यातील अनुभव, नर्मदेचे सतत सान्निध्य, मार्गात मिळणारे सत्संग, योगी विभूतींचे दर्शन, लोकजीवन यासारखी जीवनातील वास्तवता अनुभवणे ही गोष्ट मोटारप्रदक्षिणेत नसते. निसर्गाचे विलोभनीय दर्शन, नर्मदेचे ठिकठिकाणचे रूप, प्रवाह, अनेक संतांचे आश्रम, धर्मस्थाने, वन्यजीवन, लोकजीवन व संपर्क, संस्कृती तसेच विविधता इ. अनेक गोष्टी पायी प्रदक्षिणेतच अनुभवून प्रदक्षिणा करणारा खऱ्या अर्थाने सार्थ होतो. हा त्याचा अनुभव अनमोल ठरतो.

नर्मदेवर दोन मोठी धरणे नर्मदेश्वर व सरदार सरोवर झाल्याने अनेक गावे व वस्त्या लुप्त झालेल्या आहेत. बराच मोठा भाग जलाशयात गेलेला आहे. काही पवित्र स्थाने व तीर्थेही यात गडप झाली आहेत तर काही त्या प्रतीक्षेत आहेत. काहींचे वेगळ्या ठिकाणी पुनर्वसन झाले आहे. त्यामुळे आता प्रदक्षिणेचा मार्गही खूप बदलला आहे व स्थानेही बदलली आहेत. ''कालाय तस्मै नमः''

नर्मदा परिक्रमेवर अनेक पुस्तके आहेत. प्रदक्षिणेचे नियमही आहेत. आचारसंहिताही आहे. तरीपण खालील पुस्तके प्रमाण समजतात.

१) श्रीनर्मदा प्रदक्षिणा (हिन्दी)
लेखक - ओंकारानंदगिरी, प्राप्तिस्थान - नर्मदा सत्संग भवन, सेठानी घाट, नर्मदापूर, होशंगाबाद, म. प्र. - ४६१००१

२) कल्याण - तीर्थांक - गीताप्रेस, गोरखपूर - २७३००५

३) श्रीनर्मदा पुराण (स्कंदपुराण-रेवाखण्ड)

४) श्रीनर्मदा पंचांग

५) श्रीनर्मदा कल्पवल्ली

प्राप्तिस्थान - नर्मदा सत्संग भवन, सेठानी घाट, नर्मदापूर, होशंगाबाद - ४६१००१ (म.प्र.)

नर्मदा प्रदक्षिणेचे काही नियम (पायी प्रदक्षिणा करणाऱ्यांसाठी) माहितीसाठी देत आहे.

१) प्रदक्षिणा प्रारंभ क्षौर करुन नर्मदापूजन व कढई करून कन्याभोजन करवावे (कढई म्हणजे शिरा). प्रारंभ करताना नर्मदाजल बाटलीत भरून सोबत घ्यावे. त्याची रोज पूजा आरती करावी.

२) सहल म्हणून परिक्रमा करू नये.

३) अकिंचन व विरक्त वृत्ती असावी. उपासनेत खंड नसावा.

४) भिक्षावृत्ती ठेवावी. स्वयंपाकी व्हावे.

५) वागण्यात नम्रता असावी.

६) नर्मदेत अशुद्ध वस्तू टाकू नये. पात्रात प्रातर्विधी करू नये.

७) सतत ''नर्मदे हर'' उच्चारण करावे. जास्तीत जास्त वेळ नामस्मरणात घालवावा.

८) नर्मदापात्र ओलांडू नये. कोठेही कधीही. इ.

प्रदक्षिणा केल्याने अनेक शारीरिक व मानसिक रोग दूर होतात आणि माणूस स्वस्थ, शांतचित्त व संतोषी होतो. त्याचे वर्णन नर्मदालहरीत पुढील श्लोकात केले आहे.

''नियम्यात्मानं ये विहित नियमाः संतत परिक्रमं
कुर्वन्त्यस्था अमल जलसेवैक नियमाः।
सुपूतास्ते धन्या जगति बहुमान्यः परगतिं
व्रजन्त्येवं रेषा जयति खलु शर्वांग जनिसा॥''

असे आहे नर्मदा नदीचे भारतीय जीवनातील स्थान. ह्या परमपवित्र नर्मदेची ही माझी अक्षर प्रदक्षिणा, हा लेख तिच्या चरणकमळी अर्पण करताना विनंती व प्रार्थना करतो ''जय जय नर्मदे पुण्यश्लोक सरिते, हा वसंत लीन तव पदपंकजाते। मंतु क्षमा करी माझा दयाळू होउ नी मनी, सतत मम शिरी ठेवी माते तुझा वरदपाणी ॥ इत्यलम् ॥

**नर्मदाष्टक** (पौराणिक)

देवासुरा सुपावनी नमामि सिद्धिदायिनी
त्रिपूरदैत्यभेदिनी विशाल तीर्थमेदिनी।
शिवासनी शिवाकला किलोललोल चापला
तरंग रंग सर्वदा नमामि देवि नर्मदा ॥१॥

विशाल पद्मलोचनी समस्त दोषमोचिनी
गजेन्द्र चाल गामिनी विदीप्त तेजदामिनी।
कृकरी सुखाकरी अपार पार सुंदरी
तरंग रंग सर्वदा नमामि देवि नर्मदा ॥२॥

तपोनिधी तपस्विनी स्वयोग युक्तमाचरी
तपःकला तपोबला तपस्विनी शुभामला।
सुरासनी सुखासनी कुताप पापमोचिनी
तरंग रंग सर्वदा नमामि देवि नर्मदा ॥३॥

कलौ मलापहारिणी नमामि ब्रह्मचारिणी
सुरेन्द्र शेषजीवनी अनादि सिद्धधारिणी।
सुहासिनी असंगिनी जरायु-मृत्यु-भंजनी
तरंग रंग सर्वदा नमामि देवि नर्मदा ॥४॥

मुनीन्द्र-वृन्द-सेवितं स्वरूपवन्हि सन्निभ
न तेज दाहककारकं समस्त ताप हारकम्।
अनन्त-पुण्य-पावनी सदैव शम्भु भाविनी
तरंग रंग सर्वदा नमामि देवि नर्मदा ॥५॥

षडंगयोग खेचरी विभूती चंद्रशेखरी
निजात्म बोधरूपिणी फणीन्द्र-हारभूषिणी।
जटा-किरीट-मण्डनी समस्त तापखण्डनी
तरंग रंग सर्वदा नमामि देवि नर्मदा ॥६॥

भवाब्धि कर्मधारके। भजामि मातृ तारके
सुखंडग भेद खेदके
दिगन्तरात कनिष्ठ बुद्धि छेदनी, विशाल
बुद्धिवर्धिनी
तरंग रंग सर्वदा नमामि देवि नर्मदा ॥७॥

समष्टि अण्ड खण्डनि पताल सप्त भेदिनी
चतुर्दिशा सुवासिनी, पवित्र पुण्यदायिनी।
धरा धरा स्वधारिणी, समस्त लोक तारिणी
तरंग रंग सर्वदा, नमामि देवि नर्मदा ॥८॥

नर्मदा परिक्रमेत चालताना खालील कीर्तने
गातात
नर्मदा निरंजनी सर्व दुःख भंजनी, नमोः नर्मदा
माई रेवा, पार्वती वल्लभ सदाशिवा,
रेवा नाम उच्चारोगे, सकल पदारथ पावोगे।
रेवा नाम बिसरोगे, वन-वन धक्का खाओगे।
श्रीराम जयराम जय जय राम।
नर्मदे हर कभी न रहे घर। कभी रहे घर, तो
काहे की नर्मदा हर॥

**वसंत गोडबोले**
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३

प्रपंच हा परमार्थाच्या मार्गात मोठा अडसर असे जे पूर्वापारपासून संन्यासमार्गी सांगत आले आहेत, ते बिलकूल खरे नाही. उलट ‘हाती काम मनी राम’ या नामसाधनाशास्त्राच्या शिस्तीने संसार केल्यास प्रपंच हे परमार्थाचे मोठेच साधन बनते, हे रहस्यमय गुह्य-तत्त्व, ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज नेहमी ठासून सांगत असत. चारी आश्रमांमध्ये गृहस्थाश्रमच सर्वश्रेष्ठ ठरतो असे सांगून महाराज प्रापंचिकांना मोठाच दिलासा देतात. जिथे पतिपत्नी एकदिलाने परमार्थावर दृष्टी ठेवून सदाचाराने संसार करतात, तिथेच परमेश्वराचा वास असतो हे एकनाथांचे उदाहरण देऊन महाराज निश्चयाने प्रतिपादन करतात.

‘असा करी जो संसार एकनाथाचि सारखा।
जाण आहे मी तेथेच भक्तागृहिंच राबता॥’

असे श्रीभगवान कृष्ण भक्ताला सांगतात.

आता प्रपंच नेटाने करत असताना परमार्थ कसा साधावा या संदर्भात संयुक्तिक असलेली काही बोधवाक्ये :

१) नरजन्म ही परमार्थ साधून मोक्षमार्गावर प्रगती करण्याची मोठी संधी आहे. प्रपंच करत असतानाच कर्मयोगाच्या युक्तीने परमार्थ साधून जन्माचे सार्थक कसे करावे हेच संत रामदासही सांगतात.

२) आपल्या आणि ईश्वराच्या मध्ये ईश्वरनिर्मित मायाच आड येत असते. म्हणून माया ही ईश्वराचीच लीला आहे हे जाणून, साक्षीभावाने संसार केल्यास आपण मायेत अडकून पडत नाही आणि मग ईश्वर आपल्या अगदी समीप असल्याचा अनुभव आपल्याला येतो.

३) व्यवहारात लौकिक ज्ञानाचा उपयोग असला तरी परमार्थात श्रद्धा, भक्ती व त्याग याच गोष्टी उपयोगी पडतात.

४) प्रपंचाात चिरशान्ती मिळविण्यासाठी, नामाने रामाशी अनुसंधान हेच एकमेव साधन आहे.

५) आपले चिरकल्याण कशात आहे आणि आपण देवापाशी काय मागावे हे ज्याला कळते तोच खरा पंडित आणि तोचा प्रपंचात मनःशांती मिळवू शकतो.

६) मनुष्य जितका स्वार्थी पराधीनचि तेतुका।
खरा स्वतंत्र तो होई परमार्थासि लागता॥

७) प्रपंचात पदोपदी भय व काळजीतून उद्भवणारी मनाची क्षुब्धता, देवाशी अनुसंधान साधताच तत्काळ विरून जाते.

८) मनोविकारांची आणि अनाचाराची अपवित्र (विटाळाची) वस्त्रे काढून टाकल्याशिवाय माणसाला दिव्यत्वाचा स्पर्श होणे अशक्यच.

९) भौतिक प्रपंचाात अर्थार्जन करताना आध्यात्मिक अधिष्ठान सांभाळले तर तो ‘अर्थ’ अनर्थास कारण न होता परमार्थ घडवतो.

१०) प्रपंचात वागत असताना नामाचा रक्षक शिपाई आपल्याबरोबर असला तर मग मायेचे भय कशाला?

११) संसार करत असतानाच 'मीपणा' जसजसा मावळत जातो तसतसे आपण मायासागर पार करून परमेश्वराच्या जवळ जवळ जाऊ लागतो.

१२) आपला प्रपंच हा रामाचाच प्रपंच आहे असे मानून, त्याच्याच आज्ञेने, त्याचा सेवक म्हणून चालवीत आहोत, अशी भावना ठेवल्यास चिंतेला जागाच उरत नाही.

१३) सर्वसमर्पण बुद्धीने ईश्वराला शरण जाऊन त्याचा केवळ सेवक म्हणून, प्रापंचिक नियत कर्मे करणारा साधकच खरी शांती मिळवू शकतो.

१४) नित्य नामसाधनेने देवाशी अनुसंधान जुळले की देव सतत पाठीशी उभा असल्याचा अनुभव भक्तास येतो. एकदा ईशकृपा मिळाली की सर्व काही मिळाल्यासारखे आहे.

१५) भौतिक विषय मिळविण्यासाठी अर्थार्जन करीत असता देवाचा विसर पडला तर त्या अर्थाचा अनर्थच झाला म्हणून समजावे.

१६) प्रारब्ध कोणालाच टाळता येत नाही, पण ज्या प्रापंचिकाने देवाशी अनुसंधान साधले आहे, त्याला प्रारब्धाची भीती अजिबात राहत नाही. तो त्याला यशस्वीपणे सामोरा जातो.

१७) आपल्या आणि देवाच्या मध्ये आड येणारा मायेचा पडदा नामसाधनेने दूर झाल्याशिवाय देवाचा स्पर्श होणे अशक्यच!

१८) फलाशा संग सोडून, आपल्यावर आलेले नियत कार्य परमेश्वराचेच कार्य समजून, ते त्याचा सेवक म्हणून निष्काम वृत्तीने करणे, हेच कर्मयोगाचे खरे सूत्र आहे.

१९) मनशुद्ध सदाचारे परहीतात जो रत।
निर्वैर सर्व भूतांशी भक्त त्या देवप्राप्तच ॥

२०) सर्वसमर्पण बुद्धीने देवाला शरण जाऊन जो मनात निरंतर नाम धारण करतो, त्याचा निर्वाह परमेश्वरच चालवतो. (भ.गी.अ.९ श्लो.२२)

२१) हातात काम, मुखात राम आणि नामात प्रेम, मग आपलाच राम.

२२) नाम घेता, मना सांगे, देई आठव ते नरा।
आपलाची सखा राम, नसे कोणी दुजा सखा ॥

२३) कठीण काळ आला असता, नामाने रामाचा आश्रय घेतला, तर साधक संकटावर अगदी सहज कुरघोडी करू शकतो.

२४) भगवत् चिन्तनाने ज्याचे मन भरले, त्याच्या मनातील द्वेष-मत्सरादी मनोविकार पळून गेलेच असे समजावे.

२५) नामाच्या तुरटीने, मनोविकारांनी गढूळ झालेले मनाचे पाणी पारदर्शक झाले की, त्यात आत्मारामाचे प्रतिबिंब स्पष्ट दिसू लागते.

२६) एकदा नाम मनात रुजले, नामावर प्रेम जडले की ते मनातील विषयांचे विष शोषून घेते व साधकाचे मन शुद्ध राखते.

२७) संसारात गुरफटलेल्या गृहस्थास देवाची आठवण व्हावी, हाच यात्रा-सणांचा मुख्य उद्देश असतो.

२८) मनशुद्ध सदाचार आणि सत्संग या तीन गोष्टी एकत्र आल्या की कूटस्थ आत्मारामाची जाणीव होऊ लागते.

२९) ज्याने मनातले षड्रिपू जिंकून स्वतःस जिंकले, त्यानेच ईश्वराचे प्रेम जिंकले, असे होते. ईश्वराचे प्रेम जिंकल्यावर परमानंदाला कुठला पारावार!

३०) ईशप्रेमप्राप्तीसारखे भाग्य नाही आणि ईशविस्मरणासारखे दुर्भाग्य नाही.

३१) नामाचे प्रेम, संतांची संगती आणि भगवंताचा अनुभव या गोष्टी पूर्वजन्मींच्या पुण्याईशिवाय मिळत नाहीत.

सामान्य प्रापंचिकास, संसार करताकरताच (संसारत्याग न करता) परमार्थमार्गावर प्रगती करून आपल्या जन्माचे सार्थक करण्यासाठी नाम-साधना आणि सगुण भक्तियुक्त कर्मयोग या एकाच मार्गाशिवाय दुसरा पर्याय नाही हे विशद करणारी काही बोधवाक्ये.

१) ईश्वरप्राप्तीसाठी दृढ श्रद्धा अत्यंत आवश्यक असते, तेथे श्रद्धेविना ज्ञानाचा काही उपयोग होत नाही.

२) निर्गुण परमात्म्याकडे पोहोचण्यासाठी, सगुण भक्तीच्या मार्गानेच नामाच्या वाहनाने जावे लागते.

३) सर्वसाक्षी भगवान आपले बाह्यकर्मच काय, पण मनातील विचारसुद्धा पाहत असतो. हे जाणून आपण दुष्कर्माबरोबर दुर्विचारही टाळले पाहिजेत.

४) निर्गुण परमात्म्याचा अनुभव, साधक त्याच्या सगुण विभूतीत घेऊ शकतो. असे सगुण भक्तीचे महत्त्व आहे.

५) नामसाधनेच्या अग्नीत द्वेषमत्सरादी मनोविकारांची आहुती देणे हाच खरा यज्ञ होय.

६)आपल्या हातून अनाचार होऊ नये म्हणून बुद्धीवर नामाची निरंतर गस्त ठेवावी.

७) जो भक्तआपली सर्व कर्मे त्यांच्या फलांसह देवावर सोपवतो तोच खरा निश्चिंत होतो व स्वातंत्र्य उपभोगतो.

८) अहंकार पूर्णपणे गळून जाऊन स्वतःचे दोष दिसू लागणे व ते काढण्याचा प्रयत्न करावासा वाटणे, ही खरी भक्ती रुजू लागल्याची लक्षणे होत.

९) वासना विषयभोगाने तृप्त होण्याऐवजी वाढतच जातात व शेवटी देह ठेवल्यावरही आत्म्याबरोबर येऊन पुढील जन्मातही त्याची पाठ सोडत नाहीत. म्हणून या जन्मातच वासना मारल्या पाहिजेत व त्यासाठी नामासारखे दुसरे शस्त्र नाही.

१०) तसे पाहिले तर सुबुद्धी व दुर्बुद्धीला कारण ईश्वरच; त्याचे अधिष्ठान असेल तर माणसाला सुबुद्धी व नसेल तर दुर्बुद्धी लाभते.

११) कितीही विपत्ती, दुःखे आली तरी खऱ्या भक्ताचे मन नामाच्या सहवासात असल्यामुळे विचलित होत नाही.

१२) तुम्ही स्वतःच्या मनाला जिंकले की सर्व लोकांची मने जिंकू शकाल (म्हणजेच जग जिंकाल).

१३) कर्मसंन्यास व कर्मयोग या दोन निष्ठांपैकी 'कर्मसंन्यास' गृहस्थीला अशक्य असल्यामुळे त्याला कर्मयोगाचाच मार्ग खुला राहतो.

१४) परमेश्वराची जाणीव करून देतो तोच खरा वेदान्त आणि सामाजिक ऋणाची जाणीव करून

देतो तोच खरा धर्म होय.

१५) येई प्रारब्ध चालून पूर्वकर्मानुसार जे।
न चुके तेच सर्वांना संत देवांसही तसे ॥

१६) विषयांवरचे प्रेम निघून ते नामावर स्थिर झाले व सर्वसमर्पण बुद्धीने देवाला शरण गेले की मनातील भय, दुःख नाहीसे होऊन तेथे फक्त शुद्ध आनंद स्थिर होतो. अशी स्थिती प्राप्त होणे म्हणजेच ईशप्राप्ती होय.

१७) विषयांवरील प्रेम नाहीसे झाले की भक्ताची एकच इच्छा उरते, ती अशी-

सुखी असोत ते सर्व जगीं लोक निरामय।
असो कल्याण सर्वांचे दुःखावीणचि हो जग॥

१८) ईश्वराकडे किंवा संतांकडे विषयभोग मागणे, म्हणजे जेथे अमृत मिळते तेथे मद्य मागण्यासारखे आहे.

१९) एखादा भक्त नामसाधनेने अहंकारावर विजय मिळवितो, परंतु देहबुद्धीचा संपूर्ण लोप झालेला नसल्यामुळे, त्याला मला अहंकार नाही याचाच अहंकार / गर्व वाटू लागतो व तेव्हा तो परमार्थमार्गावरुन घसरून मागे येतो.

२०) साधना प्रगत झाली की साधकाला काही सिद्धी प्राप्त होतात; तेव्हाच त्याच्या परीक्षेची वेळ असते. त्या सिद्धींचाच त्याला गर्व झाला व त्याने त्या सिद्धी स्वार्थासाठी वापरल्या तर तो मोक्षमार्गावरून घसरून खाली येतो.

२१) माझा प्रपंच ईश्वराचाच आहे असे मानून, सर्व कर्मे व कर्मफळे त्याच्यावरच सोडून आपण ईश्वराचे केवळ मुनीम आहोत या भावनेने प्रपंच केला तर भय वा काळाजीचे कारणच राहत नाही व संसार सुखाचा होतो.

२२) परमार्थात 'भाव' श्रद्धेला फार महत्त्व आहे जसे प्रपंचात धनाला असते. काहीही बाह्योपचार न करता दगडाला शेंदूर लावून श्रद्धेने अनन्य भावे पूजले तरी ती सेवा परमेश्वर आनंदाने स्वीकारतो.

२३) मन-बुद्धीने निर्दोष-निर्मळ व पवित्र झाल्याशिवाय परमेश्वराची कृपा झेलण्यास आपण पात्र होत नाही, त्याची कृपा सर्वत्रच पसरलेली असली तरी पाऱ्याच्या गोळीप्रमाणे आपण ती उचलून घेऊ शकत नाही व आपण त्याच्या कृपेपासून वंचितच राहतो.

२४) माझा माता, पिता, धाता, हितकर्ता, स्वामी, गुरू - सर्व काही परमेश्वरच आहे; मी कर्ता नसून तोच करविता आहे, अशा भावनेने फलाशासंग सोडून निष्काम वृत्तीने प्रपंच केल्यास प्रपंच व परमार्थ दोन्हीही सुखाने साधतात.

२५) स्वार्थी व कर्मासक्त बुद्धीने कर्मे करणे म्हणजे प्रपंच व तीच कर्मे मी अकर्ता या भावनेने निष्काम व ईश्वरसमर्पित बुद्धीने करणे, म्हणजेच परमार्थ होय. प्रपंचाचे परमार्थात रूपांतर करण्याच्या या युक्तीलाच 'कर्मयोग' म्हणतात.

**प्र. सि. मराठे**
४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई - ४०००५५
दूरध्वनी - २६६७२२०५
भ्रमणध्वनी - ९६१९८९६४३५

●●●

**'बलोपासना' - वृत्त व्योमगंगा**

या गड्यांनो आज सारे पुष्ट कायेसी कराया
स्फूर्तिशक्ती वाढवाया शक्तिदेवाला पुजाया ॥ धृ ॥

भाग्य येई ना कधीही दुर्बळांच्या संगतीला
शक्तिवाचोनीच सांगा कोण पावे सद्गतीला
ना असे काही तुला या सौष्ठवाला वा बलाला
पूजणे आहे गड्यांनो सूर्यदेवा कारणे या ॥१॥

तो कृष्णा वाकड्या ये संगती ये तूच पेंद्या
चोपडूनी लाल माती घोटवूया मल्लविद्या
ताकदीने पाडण्याला पार कर्तव्यास आद्या
याद येता जे त्वरेने लागती बाहू स्फुराया ॥२॥

मल्लयुद्धा खेळताना एकमेकांसी भिडावे
पेच घालोनी तऱ्हेचे भूप्रदेशी आदळावे
या अशा क्रीडेतुनी गोपांघरी जे मल्ल व्हावे
गोपनारी तोषती त्या मल्लवीरांना वराया ॥ ३॥

शुद्ध अन्ना पूर्णब्रह्मा सेवुनीया तृप्त होऊ
ओज जी नांदेल कायी तीस मार्गी योग्य लावू
चांगले जे कार्य तेची या जगाला आज दावू
गोपधर्मा पाळण्याला होउ दे सुदृढ काया ॥ ४॥

या तऱ्हेने नीजकाया तावुनी सारी निघाली
शक्तियुक्तीसंगतीने रक्षण्या गोपांस आली
काय चिंता कोण आहे आपुल्या भाग्यास वाली
सिद्ध होऊ जीवनी हर्षासवे मार्गा क्रमाया ॥ ५ ॥

श्रीकृष्णाच्या कीर्तीचा सुगंध परिमळत मथुरेपर्यंतही गेल्याशिवाय राहिला नाही. भयग्रस्त कंसानं मग कृष्णवधाचं काम धेनुकासुर नामक राक्षसाला सुपूर्द केलं. एका अकराळविकराळ रानगाढवाचं रूप घेऊन धेनुकासुरानं वृंदावनानजीकच्या ताडफळांची झाडं विपुल असलेल्या एका जंगलाचा आश्रय घेतला. कृष्ण गाई राखायला त्या वनाच्या आसपास आल्यावर भयानक चावे घेऊन आणि असह्य दुगाण्या झाडून त्याचे प्राण हरण करण्याचे धेनुकासुर मनात मांडे खाऊ लागला.

एके दिवशी गाई चारता चारता पेंद्यादिकांनी जवळच्याच वनातली रुचकर ताडफळं खाण्याची इच्छा रामकृष्णांजवळ प्रकट केली. लागलीच ते सारे ताडफळांच्या वनात येऊन दाखल झाले. ही संधी साधून धेनुकासुरानं बलराम आणि कृष्णावर प्राणघातक हल्ला केला. पण तो दुगाण्या झाडायचा प्रयत्न करत असतानाच त्या दोघा भावांनी त्याचा एक-एक पाय पकडून त्याला उचलून जमिनीवर एवढ्या जोरात आपटलं की तत्काळ धेनुकासुराचे प्राण निघून गेले.

धेनुकासुरानंतर कंसानं वृषभासुर नामक आणखी एक उन्मत्त राक्षस वृंदावनी धाडला. माजलेल्या सांडाचं रूप घेतलेल्या वृषभासुरानं काही काळ वृंदावनभर मोठाच हैदोस घातला. कृष्ण समोर येताच दोन्ही शिंगांनी कृष्णाला भोसकण्याचा त्यानं प्रयत्न केला. पण दोन्ही शिंगं हातांनी धरून कृष्णानं त्याला मागे रेटलं. शिंगांच्याच साहाय्यानं त्याची मान पिरगळली आणि एक शिंग उपटून काढत त्याच्या मस्तकात

जोरानं खुपसलं. केविलवाणं हंबरत वृषभासुरानं आपल्या प्राणांचा त्याग केला.

गोपकुलानं मल्लविद्येला चांगला आश्रय दिला होता. घरी असलेलं भरपूर दुधदुभतं सेवन करावं, मनसोक्त व्यायाम करावा, गाई चारायला सोडून मग एकमेकांना भिडावं, राज्याराज्यात यज्ञानिमित्त होणाऱ्या कुस्त्यांच्या स्पर्धांमध्ये आपल्या बलाचं, कौशल्याचं प्रदर्शन करावं ही रीत गोपकुलात पिढ्यान्‌पिढ्या चालत आली होती. पण त्यामध्ये काही वळण नव्हतं, शिस्त नव्हती, अभ्यास नव्हता, ध्येय नव्हतं. बलराम आणि कृष्णानं ह्या गोष्टी आणल्या आणि शास्त्रोक्त पद्धतीनं मल्लविद्येची जोपासना केली. त्या अनुषंगानं त्यांनी सूर्योपासना आणि बलोपासनेलाही प्रोत्साहन दिलं.

कृष्णानं वृंदावनात रासक्रीडा जशी प्रसिद्ध केली तेवढ्याच हिरिरीनं बलोपासनेचाही प्रसार आणि प्रचार केला. परिणामस्वरूप गोपांचं शरीरबल वाढू लागलं. त्यांची मानसिक आणि शारीरिक प्रतिकारशक्ती वाढू लागली. रोगराई कमी होऊ लागली. गोपांच्या जीवनाचा दर्जा अधिक उन्नत झाला.

कृष्णाचा बलोपासनेचा आग्रह, त्यानं बलरामाच्या साहाय्यानं सोदाहरण घालून दिलेली उपासनापद्धती, या विषयावरचं त्याचं स्फूर्तिदायक बोलणं हे आता सर्व गोपांना चांगलं परिचयाचं होऊ लागलं होतं, कळू आणि वळूही लागलं होतं. ते म्हणायचे...

**'कालियामर्दन' - छंद कामदा**

श्रीहरी आम्ही फार त्रासलो
दारी तूझीया आज पातलो
तारीशी दये आमुच्या जीवा
ऐक सांगतो तूज केशवा ॥१॥

चित्त हे असे आमुचे जरी
शुद्‌ध चांगले जीवना परी
डोह तो पुरा नासला असे
'मीपणा' रूपे कालिया वसे ॥२ ॥

क्लेश होतसे आमुच्या मना
कालिया हरी शांत जीवना
प्रार्थना तुला हीच श्रीहरी
घालसी उडी दीन अंतरी ॥ ३॥

घेउनी स्वये चक्र तू करी
मर्दुनी तया नाचशी शिरी
पाहताच तू कालिया पळे
सूख जीवनी मीपणा गळे ॥ ४॥

अशाच एका सायंकाळी नंदाच्या वाड्यावर सारे जमलेले असताना विषय निघाला वृंदावनापासून काही अंतरावर यमुनेच्या एका डोहात वास्तव्य करून राहणाऱ्या कालिया नामक अतिप्रचंड आणि महाभयंकर विषारी नागाचा! तो विषय निघताच उत्तेजित स्वरात सारेच एकदम बोलू लागले, त्याला पाच फणा आणि दहा जिभा आहेत.

त्याच्या उष्ण आणि विषारी फुत्कारांनी डोहाच्या आजूबाजूची सारी वनसंपत्ती दग्ध झाली आहे.

एक प्रचंड कदंब वृक्षच काय तो त्या डोहाच्या काठावर कसाबसा तग धरून उभा आहे.

कालियाचे विषारी सुसकारे आसमंतात जाऊन आकाशात उडणारे पक्षीदेखील डोहाच्या पृष्ठभागावर मरून पडतात. अशा रीतीनं त्यानं नुसतं डोहाचं पाणीच नाही तर आजूबाजूचा सारा परिसरच विषमय करून टाकला आहे आणि असा तो गेली कित्येक वर्षं त्या डोहात आपल्या कुटुंबीयांसमवेत सुखेनैव राहत आहे.

त्याच्या या आगंतुकपणामुळे त्या डोहाच्या परिसरात कोणीही मनुष्य अथवा प्राणी वस्ती करू धजावत नाही. देवसरिता यमुनेच्या तटाचा आणि जलाचा कोणीही लाभ घेऊ शकत नाही.

त्या भागाला कालियामुळे अगदी स्मशानकळा आली आहे म्हणा ना !

त्याचा निःपात केला पाहिजे अन्यथा तो आज ना उद्या आपल्यालाही उपद्रव केल्याशिवाय राहणार नाही.

होय रे होय. पण त्याचा निःपात करणार तरी कोण? त्याला प्रतिबंध करणं हे काही येरागबाळ्याचं काम नव्हे. मग आपण ती जबाबदारी कृष्णावरच का टाकू नये? एकला कृष्णच कालियाचा बीमोड करू शकेल! पण या भानगडीत कृष्णाच्याच जिवाचं काही बरंवाईट झालं, देव करो अन् तसं न होवो, तर यशोदामातेला आपण काय तोंड दाखवू?

नंदमहाराजांची उतारवयातली काठीच त्यांजपासून हिरावून घेतल्यासारखं ते होणार नाही काय? आणि मग आपल्याबरोबर कोण खेळेल?

पावा वाजवून कोण आपलं मनोरंजन करेल? आपलं इतर संकटांपासून कोण रक्षण करेल? आपल्याला मल्लविद्या शिकवून कोण बलदंड करेल?

छे! छे! या संकटात आपणहून न पडणं हाच शहाणपणा आहे. आपल्या बाजूच्या यमुनेच्या पात्रात जेव्हा कालिया येईल तेव्हाचं तेव्हा बघून घेता येईल.

बरोबर आहे. उगाचच्या नसत्या लष्कराच्या भाकऱ्या बडवायला सांगितलं आहे कुणी?

असा तिकडे एकच कोल्हाळ माजला. मात्र एक वृद्धसा गोप काहीच मत न देता उगामुगा बसून राहिला होता. खुद्द कृष्णाच्याच ती गोष्ट लक्षात आली. मग तो अतिशय नम्रतेनं त्या गोपाजवळ जाऊन म्हणाला, तात, आपण काहीच का बोलत नाही? आपलं मत काय आहे?

ते ऐकताच तो वृद्ध किंचित खिन्न हसून म्हणाला, हे श्रीहरी, मला ज्या कालियाचं भय वाटतंय तो तर प्रत्यक्षातल्या कालियापेक्षाही कितीतरी पटींनी भयंकर आहे. कालिया नागाचं तू काही बरंवाईट कर अथवा न कर, परंतु मी म्हणत असलेल्या कालियाला मात्र समूळ नामशेष करून टाक एवढीच तुझ्या चरणी माझी विनंती आहे...

**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड, पुणे - ४३३ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४

●●●

## कै. विनायक चिंतमणी धोरे : एक झंझावाती व्यक्तिमत्व

**प्रकाश भास्कर दीक्षित,**
कार्यकारी विश्वस्त

यंदाचे वर्ष हे सद्धर्म परिवारासाठी खरे तर फार महत्त्वाचे वर्ष. कारण आपण आपल्या सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. सुरुवात म्हणून आपण मार्च २०१४ मध्ये ''मेघदूत आस्वादक रसग्रहण'' हा नितांत सुंदर कार्यक्रम ठाण्यात आयोजित केला होता. या कार्यक्रमात सुरुवातीला बोलताना जो आनंद व उत्साह सर्व उपस्थितांनी कै. वि. चिं. धोरे यांच्या चेहऱ्यावर पाहिला होता, तो पाहता कोणालाही धोरेकाका आज आपल्यात नाहीत यावर विश्वास ठेवणे फार अवघड आहे, पण हे नाकारता येणार नाही हेच खरे.

सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या स्थापनेपासून तन, मन, धनरूपाने या कार्यास वाहून घेणाऱ्या कै. हरी ज. दामले, उपासनींसारख्या व्यक्तींत धोरेकाकाही होते. ही सर्व मंडळी जीवनात शेवटपर्यंत या कामात कार्यरत होती. तोच पायंडा धोरेकाकांनीही सुरू ठेवलेला दिसतो. आज कार्यरत असणाऱ्या आम्हां सर्वांस त्यांची प्रेरणा बळ देत राहील असा आम्हां सर्वांस विश्वास आहे. ते तसे मिळावे हीच परमेश्वरचरणी प्रार्थना.

सुरुवातीस भारतीय रिझर्व्ह बँकेतील नोकरी सांभाळून शनिवार, रविवार वा सुट्टीच्या दिवशी गिरगावात कै. नवाथे वा कै. दामले यांच्या घरी जाऊन ट्रस्टचे काम करण्याची तारेवरील कसरत त्यांनी निवृत्तीपर्यन्त केली. त्यानंतर १९९७ च्या सुमारास ट्रस्टचे कार्यालय ठाणे येथे आल्यानंतर गेली १२-१५ वर्षे ठाण्यात पूर्वेस राहून ठाणे पश्चिमेस खोपट येथील कार्यालयात ते नियमित येत असत. त्यांनी त्रैमासिकाचे व ट्रस्टचे काम समजावून सांगून शिकवले, म्हणूनच आजची आम्हां सर्वांची वाटचाल योग्य दिशेने सुरू आहे. सर्व कामात वक्तशीरपणा, टापटीप व ते अचूक आणि निर्दोषच असले पाहिजे हा त्यांचा आग्रह होता. त्यांनी तो सहजपणे कायम सांभाळला. पिढीतील बदल लक्षात घेता तो सांभाळण्यासाठी आमच्या पिढीस कष्ट घ्यावे लागतात हे खरे असले तरी तो टिकविण्याचाच आम्ही सर्व कायमच प्रयत्न करत राहू हे नक्की.

१९९७ साली ठाणे कार्यालयातून कामकाजास सुरुवात झाल्यानंतर नियमितपणे आठवड्यातून दोन दिवस ते येत असत. दैनंदिन कामकाजातून निवृत्ती घेतल्यानंतर गेली काही वर्षे ते अंक प्रसिद्ध होण्यापूर्वीच्या काळात संबंधित सर्वांच्या नियमित संपर्कात असत. वेळप्रसंगी आम्हीही त्यांचा सल्ला व मार्गदर्शन मागत आणि घेत होतो. आता त्यांच्या नसण्याची उणीव प्रसंगानुरूप भासणार आहे. मित, मृदुभाषी स्वभाव हा त्यांचा स्थायिभाव होता. त्यांच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येकास ते आपलेसे करत व वाटत. इतका दीर्घकाल न्यासात कार्यरत असल्याने त्यांचा मित्रपरिवार व संपर्क दांडगा होता.

८९ वर्षांचे चांगले, समृद्ध, यशस्वी, समाधानी दीर्घायुष्य लाभणे हे फारच कमी लोकांच्या नशिबी असते. धोरेकाका हे त्यांपैकी एक होते यात शंका नाही. यात त्यांनी ट्रस्टसाठी आयुष्यभर केलेल्या कार्याचाही वाटा असावा असे वाटते. त्यांचे हे कार्य आम्हां ट्रस्टच्या कार्यकर्त्यांस सदैव प्रेरणादायी व उत्साहदायक तर ठरेलच, पण सद्धर्म परिवार, वाचक यांनाही प्रेरणादायी ठरेल असा विश्वास आहे.

●●●

लेखांक -४

एखादा युगकर्ता, अजोड ग्रंथ रचणारा ग्रंथकार जेव्हा स्वतःविषयी विशेष माहिती देत नाही तेव्हा कुतूहलापोटी त्या व्यक्तीभोवती तिची महनीयता सांगणारे कथांचे दंतकथांचे वलय निर्माण होते. त्याच्या कर्तृत्वावरून, लेखनकौशल्यावरून लोकांनी बांधलेले आडाखे कथांचे स्वरूप घेतात. कौटिल्याच्या संदर्भात नेमके असेच काहीसे झालेले दिसते. कौटिल्याविषयी जी काही विश्वासार्ह माहिती मिळते ती प्रामुख्याने कौटिलीय अर्थशास्त्र आणि त्यावर आधारित कामंदक विरचित 'कामंदकीय नीतिसार' या ग्रंथावरून. प्रत्यक्ष कौटिलीय अर्थशास्त्रातील अखेरच्या श्लोकात म्हटले आहे की 'ज्याने अर्थशास्त्र, शस्त्र आणि नंदवंशाच्या अमलाखाली असलेल्या भूमीचा उद्धार केला त्यानेच म्हणजे कौटिल्याने हे शास्त्र रचले.'

येन शस्त्रं च शास्त्रं च नन्दराजगता च भूः।
अमर्षेणोद्धृ तान्याशु तेन शास्त्रमिदं कृतम्॥

कामंदकानेही नीतिसारात कौटिल्याला वंदन करणाऱ्या श्लोकात प्रामुख्याने याच घटनांचा निर्देश करून कौटिल्याचा गौरव केला आहे.

यस्याभिचारवज्रेण वज्रज्वलनतेजसा।
पपात मूलतः श्रीमान् सुपर्वा नन्दपर्वतः॥

कौटिल्याच्या जीवनाविषयी इतकीच माहिती या दोन ग्रंथांतून उपलब्ध होते. चाणक्य व चंद्रगुप्त दिवंगत झाल्यावर निर्माण झालेल्या काही जैन व बौद्ध ग्रंथांत, पौराणिक ग्रंथांत, संस्कृत नाटकादी साहित्यात, लोकसाहित्यात चाणक्याचे निर्देश आणि कथा आढळतात. मात्र हे संदर्भ परंपरेतून प्राप्त झाल्याने (कुठेही लिखित स्वरूपात नसल्याने) पूर्णतः विश्वसनीय आहेत असे म्हणता येणार नाही. या ग्रंथांतून आणि कथांतून पुढे आलेल्या, कमीअधिक, भिन्न भिन्न तपशिलांनुसार आणि कौटिल्याच्या लेखनकर्तृत्वावरून विद्वानांनी बांधलेल्या कयासांनुसार कौटिल्याचा जीवनवृत्तान्त पुढीलप्रमाणे सांगता येईल.

कौटिल्य हा मगधाचा रहिवासी. तो ब्राम्हण कुळात जन्मला असावा. त्याच्यावर शिक्षणाचे उत्तम संस्कार झाले. त्याचे गुरूही श्रेष्ठ दर्जाचे होते त्या काळी भारताच्या वायव्य सीमेवर स्थित तक्षशीला या अग्रगण्य विद्यापीठात त्याचे शिक्षण झाले. स्थापत्य, युद्धविद्या, वैद्यक इत्यादी शास्त्रांसाठी या विद्यापीठाची ख्याती सर्वदूर पसरली होती. अशा या विद्यापीठात कौटिल्याने अध्ययन पूर्ण केल्यावर त्याच विद्यापीठात त्याने अध्यापनकार्याला सुरुवात केली.

या सुमारास भारतातील राजकीय व त्या अनुषंगाने सामाजिक परिस्थितीही अस्थिर होती. भारतात लहान लहान स्वायत्त गणराज्ये होती; पण त्यांचा एकमेकांशी मेळ नव्हता. एकमेकांच्या सहकार्याने प्रबळ राष्ट्र म्हणून उभे राहण्याऐवजी ही गणराज्ये एकमेकांशी कलहात गुंतली होती. या असंघटित आणि दुबळ्या गणराज्यांचा धुव्वा उडवणे, भारताच्या सीमाप्रांतावर असलेल्या इराण

साम्राज्याला किंवा जग जिंकायला निघालेल्या सिकंदराला फार कठीण नाही याची जाणीव कौटिल्याला झाली होती.

भारतातील या गणराज्यांपैकी मगध साम्राज्य मात्र प्रबळ होते; पण दुर्दैवाने त्यावर राज्य करणारा सम्राट धनानंद जुलमी व लोभी होता. मगधातील प्रजा धनानंदाच्या सत्तेने त्रस्त झाली होती. अशा या विस्कळीत गणराज्यांना व अराजकाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या साम्राज्यांना एकत्र कसे आणायचे आणि नजीकच्या भविष्यकाळात येऊ घातलेल्या परकीय संकटाला सामोरे कसे जायचे ही चिंता कौटिल्याला त्रस्त करत होती.

याच परिस्थितीत कौटिल्याला मगधाधिपती धनानंदाने बोलावले आणि दानविभागाचे प्रमुख पद स्वीकारण्याची विनंती केली. धनानंदाविषयी मनात तिरस्कार असूनही मगधसाम्राज्यात महत्त्वाचे पद सांभाळायला मिळणे ही आयती चालून आलेली संधी त्याने दूरदृष्टीने स्वीकारली. कारण क्रांतीच्या दृष्टीने ते एक महत्त्वाचे पाऊल ठरणार होते. भारतीय इतिहासाला कलाटणी देणाऱ्या घटनेची ती नांदी होती.

(क्रमशः)

**डॉ. सौ. वैशाली जयंत दाबके**
३०२, मित्तल पार्क टॉवर २,
रघुनाथ नगर,
तीन हात नाका,
ठाणे - ४०० ६०४

●●●

## *नको रे मना द्रव्य तें पूढिलांचे*

समाजाच्या आणि राष्ट्राच्या उभारणींसाठी अखंड प्रयास करणाऱ्या समर्थ रामदासांचा हा अतयंत अर्थपूर्ण आणि बाह्यतः मौलिक उपदेश आहे. मागल्या पिढीने पुढील पिढीच्या धनाची अपेक्षा बाळगू नये. त्याच्यावर आसक्ति ठेवू नये.

मुलाने डॉक्टर वा वकील किंवा इंजिनियरच व्हावे. खूप पैसा मिळवावी अशी स्वार्थी आकांक्षा मुळीच बाळगू नये.

प्रपंच करतांना 'प्रोढे वयसि तत्कुर्यात्। येन वृद्धः सुखं वसेत्' हे लक्षांत ठेवून वागावे. मुलांचे कोडकौतुक करतांना शिक्षण, लग्नकार्य करतांना केवळ मोठेपणा दाखविण्याकरता अवास्तव अनाठायी खर्च (निदान कर्ज काढून तरी) करु नये.

मरेपर्यंत अत्यावश्यक त्या अन्नवस्त्राचे बाबतीत आपण स्वावलंबी असावे, अशा उत्कट जाणिवेने वागले तर वार्धक्य सुसह्य होईल हे लक्षांत घेऊन समर्थ सांगतात :अरे मना पुढिल्यांच्या (विद्वत्तेची, पराक्रमांची अपेक्षा बाळग) परंतु द्रव्याची यत्किंचितही अपेक्षा बाळगूं नकोस! कारण ते त्यांचे आहे, तुझे नव्हे.

●●●

वदनिं कवळ घेतां नाम घ्या श्रीहरीचें
सहज हवन होतें नाम घेतां फुकाचें।
जिवन करी जिवित्त्वा अन्न हें पूर्णब्रह्म
उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म॥

हा मराठी श्लोक भोजनाला आरंभ करण्यापूर्वी सर्रास म्हटला जात असे. काही घरी अद्यापही म्हटला जातो. याचा भावार्थ असा - जेवण हे केवळ पोट भरण्याचे साधन नव्हे. ते यज्ञकर्म आहे. यज्ञात ज्याप्रमाणे कुंडात प्रज्वलित केलेला अग्नी नीट प्रज्वलित राहवा अशा तऱ्हेनेच तीळ, तूप, समिधा इत्यादी हविर्द्रव्ये अर्पण केली जातात. ती प्रमाणाबाहेर अर्पण केली तर त्याचे ज्वलन (पाचन) होत नाही. धूर पसरतो, क्वचितप्रसंगी मूळ अग्नी विझण्याची शक्यता असते. हविर्द्रव्ये अर्पणच केली नाही तरी अग्नी 'स्वयमेवोपशाम्यति' आपोआपच शांत होतो. विझून जातो.

'जठरानल' (पोटात पित्ताच्या किंवा ॲसिडच्या रूपात असलेला अग्नी) प्रमाणित रूपात प्रज्वलित राहावा याकरताच (व अन्नाभावी विझून जाऊ नये याकरताही) अन्नभक्षण करायचे असते. यज्ञात आहुती देताना मंगल अर्थवाही मंत्रांचा उच्चार करीत असत. भोजन करताना श्रीहरी, गोविंद इत्यादी नाममंत्रांचा उच्चार करावा. यज्ञशालेप्रमाणे भोजनस्थल शुद्ध असावे.

विशेषतः मन शांत निर्मल असावे. संताप, क्रोधादी तापदायक विकारांनी मन संतप्त, अस्वस्थ असेल तर त्या परिस्थितीत भक्षण केलेले अन्न नीट पचत नाही. त्यामुळे आवश्यक ते रस निर्माण होत नाही. विशुद्ध रक्ताची ठरावीक प्रमाणांत निर्मिती होत नाही. मेद, कफ इत्यादिकांची निर्मिती होऊन शरीरात अनेक दोष निर्माण होऊन आरोग्य बिघडते. रेल्वेच्या टाइमटेबलवर लक्ष ठेवून उभ्या ओणव्याने बकाबका खाल्लेल्या अन्नाचा काय परिणाम होतो हे सर्वांच्या परिचयाचे झालेले आहेच.

आपण दैनंदिन व्यवहारात वाक्याचा, श्लोकाचा वा परिच्छेदाचा संकलित अर्थ (तात्पर्यार्थ) लक्षात घेत असतो. वाक्यातील प्रत्येक शब्दाच्या अर्थाचा विचार करीत नसतो. लक्षात सामान्यतः घेत नसतो. वरील श्लोकाच्या बाबतीत तसेच घडत असले आहे. 'जिवन करी जिवित्वा अन्न हे पूर्णब्रह्म' यातील 'जिवित्वा' शब्दाचा अर्थ पुष्कळांना शब्दशः समजलेला नाही आणि त्यावाचून कोणाचे काही नडलेले पण नाही. पूर्वापार म्हणत आले आहेत त्याप्रमाणे आजही म्हटला जात आहे.

एकदा आम्ही मित्र गप्पागोष्टी करीत असता प्रसंगोपात्त जेवणावळींचा विषय निघाला. गप्पागोष्टीच त्या! कोणत्या विषयाकडून कोणत्या विषयाकडे त्या वळतील याचा नेम नसतो. आमच्यापैकी एक व्याकरण, व्युत्पत्ती आणि साहित्य यांचा चांगला जाणकार होता तो चटकन मला म्हणाला, काय रे, जिवन करि जिवित्वा यांतील जिवित्वाचा अर्थ काय? मी चक्रावलो, गोंधळलो. रोज तो श्लोक म्हणत असूनही मला त्याचा नेमका अर्थ माहीत नव्हता. मी उत्तर देऊ

शकलो नाही. स्वस्थ बसलो. ते पाहून हसत हसत गप्पांचा विषय बदलला. बऱ्याच वेळा गप्पाही संपल्या. पण माझ्या मनात जिवित्वा शब्द घर करून बसला. 'अन्नं ब्रह्मेति व्यजानात्', 'अन्नात् भवन्ति भूतानि' इत्यादी उपनिषदांतील वाक्ये आठवली. अन्नंब्रह्म... याचे अन्न हे पूर्णब्रह्म मराठी रूप आहे, हे लक्षात आले. मग संस्कृत शब्द मराठीत येताना कशी कशी रूपान्तरे होतात याचा विचार करता करता मनात प्रकाश पडला आणि जिवित्वा याचा उलगडा झाला.

जीव-जीवी त्व - जीवीत्व (जसे धन-धनी-धनित्व) जीबी म्हणजे जीव (चेतना) असलेला. जीवीत्व म्हणजे जीव असलेलेपणा (जसे गुणीत्व) जीवीत्वचे श्लोकात-पद्यात छंदाच्या अनुरोधाने 'जिवित्व' असे प्राकृत मराठी रूपान्तर झाले. त्याचा अर्थ प्रत्येक सजीव प्राणी, आपल्या चेतनत्वाची जाणीव असलेली प्रत्येक (सर्व) व्यक्ती. मराठी व्याकरणानुसार जिवित्वा हे द्वितीयेचे अविभक्तिक रूप. जिवित्वा म्हणजे जिवित्वाला म्हणजेच प्रत्येक सजीव प्राण्याला. ही शब्द-प्रक्रिया लक्षात घेतली म्हणजे अर्थ स्पष्ट व सरळ लागतो.

अन्न हे प्राणिमात्राच्या जीवनाचे कारण आहे. प्रमुख साधन आहे. ब्रह्म जीवन देते. अन्न जीवन टिकविते. जीवनांत सातत्य ठेवते. ब्रह्मापासून जसे जीवन निर्माण झाले तसेच अन्नही ब्रह्मापासूनच निर्माण झाले म्हणून जीवनकारक-पूरक अन्न हेही परब्रह्मच आहे असा 'जिवन करी जिवित्वा अन्न हे पूर्णब्रह्म' या श्लोकचरणाचा सुसंगत व स्पष्ट अर्थ होतो.

आणि मग-

'हरिर्दाता हरिर्भोक्ता हरिरन्नं प्रजापतिः।
हरिर्विप्रः शरीरस्थो भुङ्क्तेभोजयते हरिः॥
या श्लोकाचे मर्म ध्यानात येते.

अन्नाकरता जीवन नाही. जीवनाकरता अन्न आहे. ते यज्ञकर्माच्या भावनेने, श्रद्धेने, शांत मनाने भक्षण करा. तुम्हाला आरोग्य लाभेल. दीर्घायुषी व्हाल.

(जानेवारी १९९३ च्या अंकातून साभार.)

**कै. गुंडोपंत हरिभक्त**

●●●

## *नामर्दासी क्षमा न भूषण...*

अहिंसा हे पराक्रमी माणसाचे भूषण आहे. दुर्बलांना ती दूषण आहे. कारण ती निष्फळ व अर्थशून्य परिणामहीन असते. म्हणून आप्तेष्टांच्या रक्तपाताला घाबरलेला अर्जुन करुणेचे कारण दाखवून रण सोडू लागला तेव्हा कृष्णाने दिलेली समज ज्ञानेश्वरमहाराज सुंदर शब्दांत सांगतात -

तू आणि कही एक न विचारिसी। एका संभ्रमें भुलों आलासी। आणि कणवपणें निघालासी। मागुता जरी॥१॥ तरी ते तुझें अर्जुना। या वैरियां दुर्जनां। कां प्रत्यया येईल मना सांग पां ॥२॥

तेव्हा योगश्वर उपहासाने म्हणतात, अरे करुणाघना अर्जुना तू करुणेपायी युद्ध सोडून घी गेलास असे कदाचित तुझे मित्र, स्त्रीपुत्र म्हणतील. मानतीलही. पण हे दुष्ट मानतील का? मला सांग बरं. तुझे शत्रू तू जिवाच्या आकांताने रणांतून पळालास असेच म्हणतील.

●●●

(मुखपृष्ठावरून) **संपादकीय**

वास्तविक मानवाचा ज्ञात इतिहास हा हजारो वर्षांचा आहे. भारतापुरता जरी विचार केला तरी वेदांपासून ते सतराव्या शतकापर्यंत अगदी गणितासारख्या गहन विषयात लिहिल्या गेलेल्या ग्रंथांमध्येही कमीअधिक प्रमाणात दैवी शक्तींची उपासना इत्यादींचा ऊहापोह केलेला दिसतो. भारतीय संस्कृतीमध्ये वेदांना एक अनन्यसाधरण महत्त्व आहे. वेदांमधील धर्म, दैवतशास्त्र आणि भाषा यावर प्रचंड विश्लेषणात्मक अभ्यास आज उपलब्ध आहे. मॅक्समुल्लर हा वेदांचा आधुनिक अभ्यासक. मानवाचा इतिहास (अर्थातच समाजशास्त्राच्या अंगाने) म्हणजे मानवाच्या धर्मसंकल्पनेचा इतिहास असा त्याचा दृढ विश्वास होता. एवढेच नाही तर मानवाच्या धर्माचा प्रारंभ आणि त्याचा विकास यांच्या सम्यक माहितीकरता वेदवाङ्मय आणि त्यावर आधारित साहित्य अत्यंत उपयुक्त आहे हाही त्याचा सिद्धान्त होता. थोडक्यात आजच्या भारतीय माणसांच्या 'श्रद्धा' आणि 'अंधश्रद्धां'ची जडणघडण समजावून घेण्याकरता भारतीय संस्कृतीच्या सर्व साहित्याचा, कलांचा अभ्यास असणे आवश्यक आहे. कारण यामध्येच माणसाला जगण्याकरता 'श्रद्धा' आवश्यक का आहेत याचे कारण शोधता येते.

दुर्दैवाने मानवी जीवन हे विरोधाभासाने भरलेले असते. आयुष्यात कित्येक गोष्टी का आणि कशा घडतात याचे तार्किक उत्तर सापडू शकत नाही. या सगळ्या असंतुलित जीवनप्रवासाला सुसह्य करण्याचे काम अनेक वेळा श्रद्धा करतात. माणसामधील मनुष्यपण त्यामुळे जागे राहते. या श्रद्धांना संस्कारित करणे हे संस्कृतीचे काम असते. श्रद्धेची ही गरज जर आपण ओळखली नाही तर धर्मच काय, तर विज्ञानही समाजाची तेवढीच हानी करू शकते. धर्मावरील अंधश्रद्धेइतकी विज्ञानावरील अंधश्रद्धाही समाजाचे न भरून येणारे नुकसान करू शकते.

महाराष्ट्र हा सर्वच क्षेत्रांत 'पुरोगामी' असल्यामुळे नुकताच जादूटोणा, अंधश्रद्धा निर्मूलनाच्या संदर्भातही एक कायदा आपल्या कायदेमंडळाने पारित केला. कायद्याचे जंगल, आणि त्यामुळे होणाऱ्या भ्रष्टाचारामध्ये त्यात आणखी एक भर पडली. अर्थातच या कायद्याचा मूळ मसुदा आणि त्याचे आजचे स्वरूप यामध्ये खूपच फरक आहे. या कायद्याचा मूळ मसुदा हा वास्तविक एका विशिष्ट सिद्धान्ताला बांधलेला होता. वास्तविक ही सर्वच अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ, त्याचे प्रेषक आणि सच्चे कार्यकर्ते हे जडवादी सिद्धान्ताला बांधलेले आहेत. विज्ञान हे त्यांचे एक हत्यार आहे. विज्ञान म्हणजे आधुनिकता, तर्कसंगतता, वस्तुनिष्ठता तर धर्म म्हणजे या सगळ्या संकल्पनांचा अभाव अशी एक सोयीस्कर मांडणी केली जाते. धर्माइतकेच विज्ञानाचेही अज्ञान त्यामधून दिसून येते.

समाजाची आजची आगतिकता ही त्याच्या विकृत धर्मउत्सवांतून दिसून येते यात शंकाच नाही. ज्योतिषातील मंगळामुळे मानसिक दुर्बलता निर्माण होऊन अनेकांची आयुष्येही दिशाहीन झाली याबद्दलही दुमत

असण्याचे कारण नाही. आजची आपली देवळे, सण आणि व्रतवैकल्यांच्या सादरीकरणाची पद्धत हे सगळेच मूळ विचारापासून दूर गेले आहे इतकेच नाही, तर त्यामध्ये एक विकृतीही आली आहे. या सगळ्याच उपचारांमध्ये श्रद्धेपेक्षा देखावा आणि स्वार्थाचाच भाग दिसून येतो. दहीहंडी, गणपती ते नवरात्रीच्या सर्व उत्सवांचा राजकारण्यांनी आज ताबा घेतला असून त्यांना अक्षरशः रस्त्यावर आणून ठेवले आहे. सगळ्यांनीच या घटनेची अत्यंत गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. श्रद्धेची याहून वाईट विटंबना होणे शक्य नाही. दैनंदिन जीवनातील अस्थिरता, त्यातून निर्माण होणारे वैषम्य आणि ज्यांच्याबद्दल आदर बाळगायचा अशा घरातल्या, समाजातल्या, राजकारणातल्या आणि धर्माच्या नेतृत्वातील उक्ती व कृतींमधील तफावत आणि दांभिकपणा समाजाला दिशाहीन करून टाकतो. राजकारणातील भाई, दादा, अण्णा आणि काका तसेच आजच्या धर्मातील संत, महंत, भगवान आणि गुरूंनी मानवी श्रद्धांचा पोरखेळ करून टाकला आहे.

मानवाच्या मूलभूत मानसिक क्षमता आणि गरजांचा विचार हा अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीने न केल्यामुळे, ही चळवळ फक्त धर्म, देव आणि कर्मकांड या केंद्रांभोवतीच फिरत राहिली. आजच्या समाजाला खरोखरच अंधश्रद्धा निर्मूलनाची गरज आहे. देव, धर्म आणि कर्मकांड यांची सामाजिक गरज समजावून घेतल्याशिवाय ही चळवळ उभीच राहू शकणार नाही. नाहीतर ती केवळ नास्तिकवाद अथवा जडवादाच्या प्रसाराचे साधन होऊन बसते. याचे उत्कृष्ट उदाहरण हे डॉ. दाभोळकरांच्या अनैसर्गिक मृत्यूनंतर त्यांच्या अनुयायांना त्यांच्या जयंत्या, पुतळे इत्यादींची गरज भासणे आहे. हीच या चळवळीच्या वैचारिक दिवाळखोरीची सुरुवातीची लक्षणे आहेत. त्यांच्या अनुयायांनाही 'दैवत'वाद दूर करणे कठीण जात आहे. आपल्या श्रद्धेय किंवा आवडत्या व्यक्तीचे पूजन करणे,त्याची सगुण उपासना करणे हे नैसर्गिक आहे. मग ते आपले वैचारिक नेतृत्व असो किंवा पितर असोत. पितृपंधरवड्यामध्ये जवळच्याच नाही तर फार मागच्या पितरांची आठवण करणे, त्यांचे ऋण मानणे, काही कालावधीकरता दैनंदिन नित्यकर्मांपासूनदूर राहून आत्मचिंतन करणे ही अंधश्रद्धा कशी होऊ शकते?

आधुनिक जगामध्ये प्रत्येक गोष्टींचा हल्ली एक दिवस साजरा केला जातो. त्याला प्रेमापासून ते पर्यावरणापर्यंतची वेष्टणे दिली जातात. त्यांचे कार्यक्रम होतात. त्यांची प्रतीके म्हणून अनेक वस्तू विकल्या जातात. ही सर्व कर्मकांडे कुठल्या वैज्ञानिक विचारात बसतात? भाऊबीज, रक्षाबंधन यांसारखे उपक्रम मागासलेले!! आणि 'फ्रेंडशिप डे' किंवा 'व्हॅलेंटाइन डे' सारखे शुद्ध व्यावसायिक सूत्रावर आधारलेले दिवस मात्र पुढारलेपणाचे द्योतक!!; हा विरोधाभास कुठल्या वैज्ञानिक तर्कसंगतीने समर्थनीय होऊ शकतो?

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीमधील कमकुवतपणा हा ती फक्त धर्म आणि

कर्मकांडापुरती मर्यादित केल्यमुळेच आला आहे. विज्ञानावरील अंधश्रद्धांनीही मानवाचे आणि पर्यावरणाचे तेवढेच नुकसान केले आहे. याचे मुख्य कारण वैज्ञानिक हाही मनुष्यच असतो आणि मनुष्याच्या स्वाभाविक, नैसर्गिक लालसा व लोभ यांपासून तो मुक्त असूच शकत नाही. विज्ञान म्हणजे पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र आणि जैवशास्त्र हाही समज तितकाच धोकादायक आहे.

वस्तुनिष्ठता ही वस्तुरूप असलेल्या पदार्थांचा अभ्यास करताना एक वेळ येऊ शकेल; पण मानसशास्त्र, कला आणि एकंदरीतच मानवी सर्जनता या वस्तुरूप नसल्यामुळे त्यांचे मूल्यमापन किंवा मोजणी वस्तुरूप पदार्थासारखी करता येणार नाही. शिवाय जेवढ्या व्यक्ति तेवढ्या प्रकृती हे गृहीत धरले तर त्यामध्ये यांत्रिकी एकसूत्रताही आणता येणार नाही. या गोष्टींच्या अभ्यासाची, मूल्यमापनाची वेगळी पद्धती असू शकते. संगीत किंवा शिल्पातून आनंद कसा घ्यायचा हे शिकवता येऊ शकते, पण तो 'आनंद' हा व्यक्तिनिष्ठच असू शकतो. विज्ञान हेसुद्धा तर्कापेक्षा विवेकाला बांधून ठेवणे आवश्यक आहे. अर्थव्यवहार, व्यवस्थापन याही गोष्टी विज्ञानाचा भाग होऊ शकतात. या सगळ्यांच्या संदर्भातसुद्धा त्यांच्या उपयुक्ततेबाबत अंधश्रद्धा असतील तर त्या समाजाचे नुकसान करू शकतात. अंधश्रद्धा आणि त्यांचे निर्मूलन हे शिक्षणसंस्कार, परंपरा या साधनांतूनच साध्य करता येऊ शकेल.

विज्ञानभाट आणि वैज्ञानिक यांमधील फरक ओळखणे जरुरीचे आहे. विज्ञानभाट प्रचलित विज्ञान म्हणजेच अंतिम उत्तर या ठाम अंधश्रद्धेवर जगतो तर वैज्ञानिक हा प्रचलित विज्ञानामधील त्रुटी शोधून नवीन वाटा शोधण्याचा प्रयत्न करतो. वैज्ञानिक परंपरागत धर्म पाळणाराही असू शकतो किंवा धर्म आणि कर्मकांडावर विश्वास ठेवणारा चांगला वैज्ञानिकही होऊ शकतो. म्हणूनच 'अंधश्रद्धा' हा विषय कुठल्याही सिद्धान्ताशी न जोडता तपासणे अतिशय महत्त्वाचे आहे. शरिरातल्या चांगल्या पेशींमध्येच विकृती येऊन कर्करोग होतो. कर्करोगाच्या उपाचारामध्ये 'विकृत' पेशींच काढून टाकण्यात येतात. चांगल्या पेशींना शक्यतो जपण्यात येते. अंधश्रद्धेचे निर्मूलन हीसुद्धा एक अत्यंत कठीण सामाजिक शस्त्रक्रिया आहे. श्रद्धा शाबूत ठेवूनच ती करावी लागते, कारण श्रद्धेशिवाय माणूस जगूच शकत नाही.


●●●

## निवेदन

ऑगस्ट १९६५ पासून गेल्या ४९ वर्षांत, सद्धर्म त्रैमासिकाचे संस्थापक कै. गुंडोपंत हरिभक्त उर्फ महादेव गोविंद नवाथे व भूतपूर्व संपादक कै. हरी जनार्दन दामले यांनी वेळोवेळी सद्धर्ममध्ये लेख व स्फुटे लिहिली होती. सुवर्णमहोत्सवी वर्षातील एक उपक्रम म्हणून नवीन पिढीतील वाचकांसाठी, यापुढील काळात सद्धर्म त्रैमासिकात ती वेळोवेळी प्रसिद्ध केली जाणार आहेत. याची वाचकांनी नोंद घ्यावी अशी विनंती आहे.

- संपादक

# श्रद्धांजलिः।



सद्धर्म-मासिकस्य प्रारंभतः आमूलाग्रकार्यं निःस्वार्थबुद्धया येन आमरणं कृतं स धोरेकाकामहोदय : अद्य अस्माकंमध्ये नास्ति इत्यस्माकं महान् दैवदुर्विलासः । तेषां मार्गदर्शनाभावे वयमनाथाः गतपितृकाः निराधाराः दिशाहीनाः च जाताः। अधुना अस्मान् को मार्गदर्शनं करोति?

"जातस्य हि ध्रुवो मृत्युः" एषा गीतोक्तिः एव केवलमस्मान् सांत्वयितुं शक्नोति न कोऽपि अन्यः समर्थः।

धोरेकाकामहोदयः संस्कृतानुरागी आसीत् अतः एषा श्रद्धाञ्जलिः मया संस्कृतभाषायामेव लिखिता। अन्यच्च भवतः संस्कृतभाषाप्रेम भवता कतिपयानि संस्कृतधार्मिकपुस्तकानि ट्रस्टद्वारा प्रकाशितानि कृत्वा भवता प्रकटीकृतम्। रामरक्षा, शिवमहिम्न, गणपत्यथर्वशीर्ष, गङ्गालहरी, सांख्यदर्शनम् इत्यादिनि।

अथ न केवलं आसेतुहिमाचलं भवता पुरस्कृतं सद्धर्मत्रैमासिकं सद्-धर्मं दर्शयति अपितु परदेशवासिनः जनाः अपि ज्ञानं लब्ध्वा वाचनानन्दमनुभवन्ति अत्र का शङ्का।

सुवर्णमहोत्सवे वर्षे भवतः अनुपस्थितिः प्रामुख्येन अनुभूयेत। ईश्वरः भवतः आत्मने शान्तिं प्रददातु इति नम्रभावेन श्रद्धांजलिं अर्पये।

भवदीयः

**दि. दा. औटी**

●●●

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१
**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१